cmyk

## संपादकीय

### तर गावं अशीच बुडत राहतील...!

महाराष्ट्र, गोवा, कर्नाटकसह देशाच्या विविध भागांत सध्या पावसाने दाणादाण उडवून दिली आहे. मे आणि जूनमध्ये दमदार बरसलेल्या पावसाने जुलै आणि अर्ध्या ऑगस्टमध्ये काहीसा ताण दिला. त्यानंतर पुन्हा पावसाचे जोरदार पुनरागमन झाले असून, मागच्या दोन दिवसांतील पावसाने विविध राज्यांमधील जनजीवन विस्कळित झाल्याचे पहायला मिळाले. यंदा पावसाचे वेळापत्रक बिघडले असले, तरी आत्तापर्यंत महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत चांगल्या पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे नियोजित वेळेआधीच अनेक धरणे ओसंडून वाहू लागली. तर काही धरणांमध्ये लक्षणीय जलसाठा झाल्याचे दिसत आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–११६ | गुरूवार, दि.२१ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### राज्यात आजही मुसळधार पावसाचा इशारा

पुणे: राज्यात आजही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून महाराष्ट्रात पुढील २४ तासांसाठी मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर दुसरीकडे रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गडचिरोली या जिल्ह्यासह कोल्हापूर घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, हवामान खात्याने वर्तवलेल्या अतिवृष्टीच्या अंदाजानुसार, आपत्कालीन परिस्थितीत सर्व जिल्हा प्रशासनांना अधिक सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## थोडक्यात...

### विजेच्या धक्क्याने एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

जळगाव : जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यात खेडी गावाजवळ शेतात विजेच्या धक्क्याने एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

### गोदाकाटच्या परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

बीड–गोदावरी नदीकाठ परिसरात नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नाशिक महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापनाकडून गोदाकाट परिसरातील नागरिकांना अलर्ट करण्यात येत आहे. गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. रामकुंड परिसरातील मंदिर पाण्याखाली गेलं आहे. तसेच पुराचे मापदंड समजल्या जाणाऱ्या दुतोंड्या मारुतीच्या कमरेवर पाणी गेले आहे.

### गेवराईत घराची भिंत कोसळून एकाचा मृत्यू

बीड–गेवराई तालुक्यातील ढालेगाव येथे राहत्या घराची भिंत कोसळुन एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सकाळी साडेनऊ वाजता ही दुर्दैवी घटना घडली. यामध्ये नजीर कटु पठाण वय ७० वर्षे यांचा मृत्यू झाला आहे. पावसाचे पाणी भिंतीत मुरल्याने ही घटना घडली असल्याची प्राथमिक माहिती आहे. तर घरातील संसारपयोगी वस्तुंचे देखील नुकसान झाले आहे.

### ऑनलाइन गेमिंगशी संबंधित विधेयक लोकसभेत सादर

नवी दिल्ली–ऑनलाइन गेमिंग प्रमोशन अँड रेग्युलेशन बिल, २०२५ लोकसभेत सादर करण्यात आले आहे. हे विधेयक ई–स्पोर्ट्स आणि ऑनलाइन सोशल गेम्सना प्रोत्साहन देते. तसेच त्यांच्याशी संबंधित हानिकारक ऑनलाइन मनी गेमिंग सेवा, जाहिराती आणि आर्थिक व्यवहारांवर बंदी घालते. हे विधेयक ऑनलाइन फॅन्टसी स्पोर्ट्सपासून ते ऑनलाइन जुगार आणि ऑनलाइन लॉटरीपर्यंत सर्व ऑनलाइन बेटिंग आणि जुगार क्रियाकलापांना बेकायदेशीर ठरवते.

### रोहित पवारांचा संजय शिरसाटांवर घोटाळ्याचा आरोप

मुंबई–नवीन मुंबईत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा सिडको भवनावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात रोहित पवार यांनी मंत्री संजय सिरसाट यांच्यावर ५ हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप केला आहे.

# मुसळधारने २० लाख एकरवरील पिकांवर फिरले पाणी!

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती; नुकसानीची अंतिम आकडेवारी जाहीर

**वाशिम । प्रतिनिधी**

**पावसाचा मोठा फटका शेती पिकांना देखील बसला आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात २० लाख १२ हजार एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असल्याची माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यामुळे या बाधित क्षेत्राचे तातडीने पंचनामे होऊन शेतकऱ्यांना लवकर मदत मिळण्याची खरी गरज आहे.**





राज्यात गेल्या दोन दिवसात मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. अनेक भागात या पावसामुळं जनजीवन विस्कळीत झाले आहे. नदी नाल्यांना पूर आले आहेत. धरणांच्या ▶▶ पान २ वर

### १८७ तालुके आणि ६५४ महसूल मंडळांमध्ये मुसळधार पाऊस झाला

राज्यातील ऑगस्ट २०२५ मधील अतिवृष्टीमुळे खरीप हंगामावर मोठा परिणाम झाला आहे. राज्यातील तब्बल १९ जिल्ह्यांमधील १८७ तालुके आणि ६५४ महसूल मंडळांमध्ये मुसळधार पाऊस झाला असून मोठ्या प्रमाणावर शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार, ८०५११० हेक्टर म्हणजे तब्बल २०१२७७५ एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १०००० हेक्टरपेक्षा जास्त नुकसानग्रस्त क्षेत्र असलेले ११ जिल्हे समोर आले आहेत.

### सर्वाधिक नुकसानग्रस्त जिल्हे

नांदेड : २८५५४३ हेक्टर, वाशिम १६४५५७ हेक्टर, यवतमाळ ८०९६९ हेक्टर, बुलढाणा ७४४०५ हेक्टर, अकोला ४३७०३ हेक्टर, सोलापूर ४१४७२ हेक्टर, हिंगोली ४०००० हेक्टर

# बुडीत बँकांतील ठेवी लिक्विडेटरमार्फत मिळणार










**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यासह राज्यातील विविध भागात शाखा असलेल्या ज्ञानराधा, जिजाऊ, शुभ कल्याण, जिजामाता व राजस्थानी मल्टीस्टेट पंतसंस्था चालकांनी ठेवीदारांना कोट्यावधींचा चुना लावलेला आहे. ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत, यासाठी खा सोनवणे यांनी पाठपुरावा केलेला आहे संसदेच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व प्रभावी मांजणीमुळे या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लक्ष घातले असून आता ठेवीदारांना लिक्विडेटरमार्फत ठेवी परत मिळतील, असे लेखी उत्तरही दिले आहे.**

बहु–राज्य सहकारी पतसंस्थांनी ठेवीदारांचे पैसे न परतवल्याबाबत लोकसभा प्रश्नोत्तरात केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी महत्त्वाची माहिती दिली. बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी अशा सर्व बहुराज्यिय पतसंस्थांमधील ठेवी परत मिळण्यासाठी संसदेमधे ▶▶ पान २ वर

# न्यायालयात सरकारी वकीलाची आत्महत्या

## खिशात सापडलेल्या चिठ्ठीतून होणार आत्महत्याचा उलगडा

**वडवणी । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील वडवणी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून गेल्या सात महिन्यापूर्वी रुजू झालेल्या व्ही एल चंदेल वय अंदाजे ५० वर्षे यांनी काल दिनांक २० ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी दहा ते साडेदहाच्या दरम्यान सहाय्यक सरकारी अभियोक्ता कार्यालयात खिडकीच्या लोखंडी गजाला शालीच्या कपड्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडलेली आहे.**



बीड जिल्ह्यातील वडवणी येथे दिवाणी व फौजदारी न्यायालय असुन या न्यायालयामध्ये जानेवारी २०२५ मध्ये सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून व्ही एल चंदेल हे रूजु झालेले होते तरी चंदेल यांनी काल दि. २० ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी दहा ते साडेदहा वाजण्याच्या सुमारास न्यायालयातील सहाय्यक सरकारी अभियोक्ता कार्यालयातील खिडकीच्या लोखंडी गजाला शालीच्या कपड्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे यामध्ये चंदेल यांच्या खिशा मध्ये लिहिलेली चिट्ठी सापडलेली ▶▶ पान २ वर

# बातमीच्या दणक्यानंतर त्या अधिकाऱ्याने रेस्ट हाऊस सोडले

बीड । प्रतिनिधी

बीड येथे बदलून आलेले सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड या पदावर कार्यरत असलेले अधिकारी गेल्या दीड वर्षापासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विश्रामगृहात बेकायदेशीर रितीने मुक्कामाला होते मात्र याच्या बातम्या प्रकाशित होताच संबंधित अधिकाऱ्याने तेथील आपला विस्ताना उचलून रेस्ट हाऊस रिकामी केले.

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड ही सातत्याने वादाच्या भोवऱ्यात असते. जिल्हा बँक शेतकऱ्यांची बँक राहिलेली ▶▶ पान २ वर

# शंभर कोटीच्या रस्त्यांना मंजुरीच नाही– डॉ. योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**चांगले आणि दर्जेदार रस्ते होण्यासाठी मोठ्या बजेटची गरज होती. अजित दादांनी यावर बैठकीत चर्चा केली. पालकमंत्री अजित दादा पवार यांनी या रस्त्याचा आढावा घेतला. मात्र मुंबईत बैठक झाल्यानंतरच याला मंजुरी मिळणार असल्याचे सांगुन १०० कोटीचे रस्ते मंजूर झाल्याच्या बातम्या चुकीच्या असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा प्रमुख डॉ. योगेश क्षीरसागर यांनी पत्रकार परिषद बोलताना व्यक्त केले.**

यावेळी बोलताना ते म्हणाले की डीपी रस्त्याचा प्रस्ताव जुनाच आहे. आपण याची पूर्वीच मागणी केली होती. चांगल्या दर्जाच्या रस्त्यासाठी मोठे बजेट लागणार होते. त्यामुळे याचा आढावा घेण्यात आला. मात्र याला मंजुरी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळणार असल्याने शंभर कोटीचे रस्ते मंजूर झाले ▶▶ पान २ वर



# तक्रारदारास अधिकाऱ्याकडून शिवीगाळ

## • बीड एसपी ऑफीस मधील घटना

**बीड । प्रतिनिधी**

**सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोष्ट व्हायरल करून दोन समाजातील दरी निर्माण करणाऱ्या विरुद्ध सामाजिक कार्यकर्त्यांनी सायबर पोलिसांमध्ये तक्रार दाखल केली होती या संदर्भात चौकशी करण्यासाठी गेलेल्या सामाजिक कार्यकर्त्याला सायबर सेल मधील पोलीस अधिकाऱ्यांनी दमदाटी करत बाहेर हाकलले मला एवढेच काम नाही म्हणत शिवीगाळ केल्याची घटना देखील घडली असल्याचे तक्रारदार यांनी म्हटले आहे.**

जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी बीड पोलिसांची प्रतिमा सुधारण्यासाठी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले बारकोड सारखा उपक्रम देखील सुरू केला त्यामुळे तक्रारदाराला कोणतीही अडचण न येता त्याचा प्रश्न सुटावा परंतु आता पोलीस अधिकारीच आरोपी सारखे वागत असल्याचे आजच्या घटनेवरून दिसत आहे सायबर सेल मध्ये माऊली शिरसाट यांनी पूजा वाघ या फेसबुक अकाउंट संदर्भात तक्रार दाखल केली होती आज मोहन आघाव माऊली शिरसाट व अन्य सामाजिक कार्यकर्ते यासंदर्भात चौकशी करण्यासाठी पोलीस अधीक्षक ▶▶ पान २ वर

### एसपीने घेतली दखल डीवायएसपी करणार चौकशी

सायबर सेलमध्ये झालेल्या घटनेनंतर सामाजी कार्यकर्त्यांनी पोलिस अधीक्षकाना भेटून निवेदन दिले. यानंतर एसपीने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी डीवायएसपीची नियुक्ती केली असून कार्यालयात घडलेल्या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज जमा करण्याचे आदेश या वेळी शिष्टमंडळासमोर दिले.

# मुलींना शैक्षणिकसह परीक्षा शुल्क माफ

## राज्य सरकारचा मोठा निर्णय; ८४२ व्यवसायिक अभ्यासक्रमांचा समावेश

**मुंबई ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींसाठी अतिशय आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र सरकारने मुलींच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वाचा निर्णय घेतलाय. या निर्णयाअंतर्गत ८४२ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक आणि परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. यामुळे राज्यातील लाखो मुलींना याचा फायदा होणार आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पुढाकाराने मुंबईतील सिडनहॅम महाविद्यालयात यास्मिन सर्वेअर यांचा अर्धपुतळा बसवण्यात आला. यावेळी ते बोलत होते.**

यास्मिन सर्वेअर यांच्या पुतळ्याचे अनावरण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास धुरे आणि माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाले.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'विकास शुल्क, 'प्रयोगशाळा शुल्क' यासारख्या इतर शुल्कांपासूनही विद्यार्थिनींना मुक्त करण्याची योजना आखली आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि प्रवर्गातील मुलींना शिक्षण घेणे अधिक सुलभ होईल अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. भारतात पुरुषांचे शिक्षणाचे प्रमाण ८१ टक्के असताना, महिलांचे केवळ ▶▶ पान २ वर

### महिलांचे शिक्षणातील प्रमाण वाढेल

शैक्षणिक संस्थांना प्रथम 'इतर शुल्क' कमी करण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत. याला प्रतिसाद न मिळाल्यास, ही शुल्के पूर्णपणे माफ करण्यासाठी कायदेशीर प्रारूप तयार केले जाईल. यामुळे मुलींना आर्थिक अडचणींशिवाय उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळेल आणि महिलांचे शिक्षणातील प्रमाण वाढेल.

# राज्यात पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या गेल्या काही महिन्यांत सातत्याने होत असल्याचे पाहायला मिळत असून आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा सिलसिला सुरूच आहे. राज्यातील पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. गेल्या दोन आठवड्यापासून राज्यातील आयएएस ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३०.५० क्विंटल | २,४५० | २,९३१ | २,६२५ |
| ज्वारी/हायब्रिड :२३.०० क्विंटल | २,१११ | ३,४८५ | २,४९७ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.५० क्विंटल | ५,८०० | ५,९६० | ५,८८० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: ३०.०० क्विंटल | २,००० | ३,५०० | २,६३५ |
| मुग: २.०० क्विंटल | ६,७५१ | ६,७५१ | ६,७५१ |
| सोयाबीन: ३८.०० क्विंटल | ४,६११ | ४,६११ | ४,६११ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,८०१ | ५,८०१ | ५,८०१ |

# राज्यात पोलीसांची १५ हजार पदे भरली जाणार

## भरतीचा शासन निर्णय प्रसिद्ध, परीक्षा शुल्क ठरले

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाकडून १५६३१ पदांच्या पोलीस शिपाई भरतीला मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भातील प्रक्रिया लवकरच सुरु होईल. भरतीचा शासन निर्णय प्रसिध्द झाला असून परीक्षा शुल्क सुध्दा ठरले आहे.**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने १२ ऑगस्टच्या बैठकीत १५६३१ पदांची पोलीस भरती करण्याचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयानुसार गृह विभागाने १५६३१ जागांवर पोलीस शिपाई भरती करण्याचा निर्णय घेतण्यात आला आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई आणि कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी



राबविण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेस मान्यता देणारा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई तसच कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील दि.१ जानेवारी २०२४ ते दि ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत रिक्त झालेली आणि शासन निर्णय क्रमांकः पोलीस–११२५/प्र.क.१७३/पोल–५अ, दिनांक २० ऑगस्ट, २०२५ दि.०१ जानेवारी २०२५ ते दि ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत रिक्त होणारी १५६३१ पदे भरतीकरीता उपलब्ध होणार आहेत. शासन निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ४ मे २०२२ आणि २१ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदींमधून शिथिलता देऊन पोलीस शिपाई भरती सन २०२४–२५ ची भरती प्रक्रिया घटकस्तरावरुन राबविण्यास तसेच आधारीत लेखी ▶▶ पान २ वर

### रिक्त पदांची संख्या

पोलीस शिपाई : १२३९९, पोलीस शिपाई चालक : २३४, बॅण्डस्मन : २५, सशस्त्र पोलीस शिपाई : २३९३, कारागृह शिपाई : ५८०, एकूण १५६३१

# दुधाला भाव द्या म्हणत खा.सोनवणे झाले आक्रमक

## संसदेसमोर आंदोलन, दूध अनुदान पुन्हा सुरू करण्याचीही मागणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील दूध उत्पादक शेतकरी त्यांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर सतत आंदोलन करीत आहेत, परंतु त्यांच्या मागण्यांकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. यामुळे खा.बजरंग सोनवणे यांनी अनेक खासदारांना एकत्रित करत दि.१९ रोजी संसदेसमोरच आंदोलन केले.

राज्यात शेतकरी आणि दुध उत्पादक अडचणीत आहेत. दुधाला मिळणारा भाव आणि जनावरांवर होणारा खर्च याचा ताळमेळ बसायला तयार नाही. यामुळे दुध उत्पादकांना दुधाचा दर वाढून मिळावा, यासाठी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी सहकारी खासदारांना एकत्रित करून दिल्ली येथे संसदभवन समोर आंदोलन केले. यावेळी



गायी व म्हशीच्या दुधाला दर वाढऊन द्यावा, बंद केलेले दूध अनुदान पुन्हा सुरु करावा, दीर्घकालीन दूध ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# तर गावं अशीच बुडत राहतील...!

महाराष्ट्र, गोवा, कर्नाटकसह देशाच्या विविध भागांत सध्या पावसाने दाणादाण उडवून दिली आहे. मे आणि जूनमध्ये दमदार बरसलेल्या पावसाने जुलै आणि अर्ध्या ऑगस्टमध्ये काहीसा ताण दिला. त्यानंतर पुन्हा पावसाचे जोरदार पुनरागमन झाले असून, मागच्या दोन दिवसांतील पावसाने विविध राज्यांमधील जनजीवन विस्कळित झाल्याचे पहायला मिळाले. यंदा पावसाचे वेळापत्रक बिघडले असले, तरी आत्तापर्यंत महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत चांगल्या पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे नियोजित वेळेआधीच अनेक धरणे ओसंडून वाहू लागली. तर काही धरणांमध्ये लक्षणीय जलसाठा झाल्याचे दिसत आहे. आता दुसऱ्या टप्प्यातही पावसाने ऊद्रावतार धारण केल्याने अनेक गावांना, जिल्ह्यांना पुराने वेढा दिल्याचे चित्र आहे. तसे हे नेहमीचेच दृश्य आहे. महाराष्ट्र असो की देशातला कुठलाही भाग विशिष्ट ठिकाणी नेहमीच मोठा पाऊस होतो आणि त्यात मोठ्या प्रमाणात जीवित हानी सुद्धा होते. हे गेल्या अनेक वर्षांपासून होत आलेले असतानाही, कोणत्याच सरकारने त्यावर समाधानकारक तोडगा काढलेला नाही. नुकसान झाल्यानंतर आणि जीवित हानी झाल्यानंतर सरकार मोठ्या प्रमाणात मदत देण्याची घोषणा करते आणि आपण जबाबदारी पार पाडली असे भासवते. मात्र ज्या घटना सातत्याने घडत आहेत आणि घडणार आहेत हे माहीत असूनही त्यावर कायमस्वरूपीची उपाययोजना वा खबरदारी न घेणे याला काय म्हणायचे ? सरकारची असेच धोरण राहिले तर दरवर्षी अशाच पद्धतीने शहर आणि गाव सुद्धा बुडत राहतील.

महाराष्ट्रातील मराठवाडा हा तसा दुष्काळी पट्टा. तथापि, मागच्या दोन ते तीन दिवसांत मराठवाड्यात विक्रमी पाऊस होत आहे. नांदेडमध्ये तर अक्षरश: ढगफुटी झाली असून, तब्बल २०६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजीनगर, लातूर, बीड, परभणी यांसह जवळपास सर्वच जिल्ह्यात दणकून पाऊस झाला आहे. विदर्भालाही पावसाने तडाखा दिल्याने पैनगंगेसह येथील सर्व नद्याही दुथडी भरून वाहताना दिसतात. तर मध्य प्रदेश, सातपुडा व खान्देशातही जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्याने तापी, पूर्णा या महत्त्वाच्या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तर उत्तर महाराष्ट्रातील महत्त्वाचे धरण म्हणून जळगावातील हतनूर धरणाचा उल्लेख केला जातो. येथून तब्बल पावणे दोन लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे यातून या पट्ट्यातील पावसाची कल्पना करता येईल. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण हा पावसा पाण्याचा प्रदेश. पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूरसह एकूणच पश्चिम घाट क्षेत्रात पावसाची संततधार सुरू आहे. तर रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्गलाही पावसाने चांगलाच तडाखा दिला आहे. त्यामुळे अगदी कोयना, कृष्णा, पंचगंगेपासून काळ, सावित्री, जगबुडी, गड, वाशिष्ठी अशा सगळ्याच नद्या धोकादायक पातळीवरून वाहत आहेत. राज्यातील महत्त्वाचे धरण असलेल्या कोयनेसह अनेक धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे.

मागच्या काही वर्षांत कमी कालावधीत अधिकचा पाऊस अर्थात ढगफुटीच्या पावसाचा आपल्याला वारंवार अनुभव येत आहे. नांदेडमध्ये झालेला पाऊस याच प्रकारातील ठरावा. तेथे लेंडी नदीला आलेला पूर अभूतपूर्वच. याआधीही लेंडीला पूर आल्याची उदाहरणे आहेत. परंतु, या खेपेला झालेली हानी मोठीच म्हणावी लागेल. ढगफुटीने अनेक गावांमध्ये पाणी शिरल्याने कितीतरी जणांवर बेघर व्हायची वेळ आली. तर पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या २०० हून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. तर काही जणांना आपला जीव गमवावा लागल्याचीही उदाहरणे आहेत. एकूणच महाराष्ट्रातील या प्रलयंकारी पावसात प्राणहानी, वित्तहानीसह शेतीचेही मोठे नुकसान झाले. सोयाबीन, कपाशी, काढणीला आलेला मूग, उडीद, केळी आदी पिकांचेही मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. राज्य सरकारकडून तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून, या अतिवृष्टीने साधारणपणे ४ ते ५ लाख हेक्टरवरील पिकांना फटका बसल्याचा अंदाज आहे. याशिवाय पशुधनाला मोठा फटका बसल्याचे दिसते. शेती आणि शेतीपूरक व्यवसायातून शेतकरी आपला उदरनिर्वाह करत असतो. या वर्षी चांगल्या पावसाचा अंदाज असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. प्रत्यक्षात अतिवृष्टी, पावसाचा बदललेला कालावधी यामुळे शेतीकरिता यंदाचा पाऊस फारसा फायदेशीर ठरलेला नाही. त्यामुळे आज तरी शेतकऱ्याच्या डोळ्यात अश्रू दिसतात. पावसाचा ओघ असाच राहिला, तर नुकसानीचा आकडा आणखी वाढू शकतो. महाराष्ट्राच्या अर्थकारणात पुणे, मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर व इतर शहरांचा महत्त्वाचा मोठा वाटा आहे. परंतु, पावसाच्या पाण्यात येथील नियोजनव्यवस्था कोलमडली आहे. मुंबईची तुंबई झाल्याने हे शहर ठप्प झाले आहे. पुण्याचीही वेगळी स्थिती नाही. जलमय झालेले रस्ते, वाहतूक कोंडी यामुळे पुण्याचीही मुंबई झालेली दिसते.

जे चित्र महाराष्ट्राचे, तेच इतर राज्यांचे. कर्नाटक, गोव्यापासून पंजाब, ओरिसा, मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेशातही दमदार पाऊस होत आहे. हिमाचलमध्ये तर भूस्खलनाच्या घटनांचे सत्र सुरूच असून, ४०० हून अधिक रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. ओडिशाची राजधानी भुवनेश्वरसह अनेक शहरांना पुराच्या पाण्याचा विळखा पडला आहे. पंजाबमध्ये सतलज, बियास नद्यांना पूर आल्याने अनेक शहर व गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. याशिवाय उत्तराखंडमध्ये पावसाच्या ऊद्रावतारामुळे राज्यातील जनजीवन व पर्यटनाला मोठा फटका बसला आहे. रेल्वे, विमान आणि बस या तिन्ही सेवा प्रवाशांसाठी महत्त्वाच्या असतात. परंतु, या तिन्ही सेवा कमी अधिक प्रमाणात ठप्प झाल्याने राज्यातील व परराज्यातील प्रवासी मोठ्या प्रमाणात खोळंबले आहेत. त्याचबरोबर दळणवळणालाही चांगलाच ब्रेक बसला आहे. पावसाने झोडपले, तर तक्रार कुणाकडे करायची, अशा अर्थाची आपल्याकडे म्हण आहे. ते खरे असले, तरी ढगफुटी वा पुराची तीव्रता वाढण्यास प्रामुख्याने मानवी आक्रमण कारणीभूत आहे, हे विसरता येणार नाही. रस्त्याची कामे, वेगवेगळे प्रकल्प, प्रवाहांची वळवावळवी, डोंगरफोड यामुळे ग्रामीण भागातील नैसर्गिक भूरचनेमध्ये बाधा निर्माण होत आहे. त्यातून अनेक भागांत पुराची तीव्रता वाढत असल्याचे निसर्गअभ्यासक व पर्यावरणतज्ञांचे म्हणणे आहे. ही वस्तुस्थितीच होय. ढगफुटीचा ट्रेंड हे तर ग्लोबल वॉर्मिंगचेच अपत्य म्हणता येईल. जागोजागी अचानकपणे होणाऱ्या या ढगफुटीसदृश पावसाने मागच्या काही वर्षांत सर्वांच्याच नाकात दम आणला आहे. निसर्गावरील आक्रमणाचे सत्र असेच सुरू राहिले, तर ढगफुटीचा हा धोका भविष्यकाळात आणखी वाढण्याची भीती आहे. परंतु, त्यातून कुणीच काही बोध घेण्यास तयार नाही. म्हणूनच भविष्यातील राज्य किंवा शहर कसे असावे, याचे सूत्रबद्ध नियोजन सरकारने आता तरी करायला हवे. अन्यथा, शहरे, गावे अशीच बुडत राहतील.

# एलसीबी व नेकणुर पोलिसांनी पडकला ४ किलो गाजा



**नेकणुर । प्रतिनिधी**

**जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या संकल्पनेतुन नशा मुक्ती अभीयान नुकतेच राबवले गेले त्यातच आज एलसीबी आणि नेकणुर पोलिसांना मिळालेल्या माहिती नुसार नेकणुर परिसरात एका पाढऱ्या रंगाच्या गाडीसह चार किलो गाजा आणि कार असा एकुण साडेचार लाखाचा मुद्देमाला जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला.**

आज दि.२०/०८/२०२५ रोजी पो.नि.शिवाजी बंटेवाड यांनी अवैद्य धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश पोउपनि महेश विघ्ने व त्यांच्या टीम ला दिल्या होत्या. यावरुन पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने हे त्यांचे टीम सह केज उपविभागतील नेकणुर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनिय माहीती प्राप्त झाली की एक ईसम पांढऱ्या इंडीगो गाडीत अवेद्यरित्या गांजा घेवुन विक्री करण्याकरीता चाकरवाडी-डिघोळअंबा रोडने येणार आहे. सदर माहीती पोउपनि महेश विघ्ने यांनी पो.नि.शिवाजी बंटेवाड व नेकणुर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि चंद्रकांत गोसावी यांनी दिली.मा.वरीष्ठांच्या परवाणगीने स्थानिक गुन्हे शाखाचे व पो.स्टे नेकणुर चे अधिकारी अमंलदार हे दुपारी ०३.१५ वा दरम्यान चाकरवाडी-डिघोळ अंबा रोडवर नाकाबंदी करुन वाहनाची तपासणी करत असताना एक पांढऱ्या रंगाची इंडीगो गाडी जिचा वाहन क्र.-१४--१४०३ ही नाकाबंदी बंदी दरम्याण तपासली असता सदर वाहनात दत्ता मधुकर भोजणे रा. वाघे बाभुळगाव हा हजर मिळुन आला. सदर गाडीत एकुण ०४ किलो १४० ग्रॅम वजनाचा गांजा मिळुन आला. सदर वाहन व गांजा असा एकुण ४,५०,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन ईसमनामे दत्ता मधुकर भोजणे रा. वाघे बाभुळगाव याचे विरुध्द पोलीस स्टेशन नेकणुर येथे पोउपनि महेश विघ्ने यांनी गु.र.नं २२८/२०२५ कलम २०(),८() कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स्था.गु.शा बीड व नेकणुर पोलीस करत आहेत. सदरची कामगिरी ही मा. नवनीत कॉवत, पोलीस अधिक्षक अधिक्षक बीड, मा. अपर पोलीस अधिक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.शिवाजी बंटेवाड, सपोनि चंद्रकांत गोसावी, पोउपनि महेश विघ्ने, पोहवा महेश जोगदंड, पोहवा जफर पठाण, पोहवा भागवत शेलार, पोहवा दिपक खांडेकर, पो.अं.बप्पासाहेब घोडके, पोहवा राख, पोहवा बांगर, पोहवा बळवंत, चापोहवा मराडे, राठोड यांनी केली आहे.

# महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट भटके विमुक्त दिन म्हणून साजरा होणार

**अंबड । प्रतिनिधी**



महाराष्ट्र सरकारने ३१ ऑगस्ट हा दिवस राज्यात भटके विमुक्त दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली आहे स्वातंत्र्यलढ्यात आणि राष्ट्र उभारणीत भटके विमुक्त समाजाचे योगदान मोठे होते त्यांच्या सन्मानार्थ हा निर्णय घेण्यात आला असून समाजातून या निर्णयाचे स्वागत होत आहे राष्ट्रीय विमुक्त घुमंतू जनजाती महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अंकुश चव्हाण यांनी या घोषणेबद्दल शासनाचे आभार मानले आहेत भाजप आमदार प्रवीण दटके राष्ट्रीय घुमंतू जनजाती महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष (युवा मोर्चा) प्रोफेसर डॉ. अंकुश चव्हाण राष्ट्रीय नेते लक्ष्मण जी गायकवाड नारायण जी चव्हाण यांनी उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही हा दिवस साजरा करण्याची मागणी शासनाकडे अनेक वेळा केली होती त्यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले असून सरकारने याबाबत जीआर जारी केला आहे. इंग्रजांनी १८७१साली देशातील १९३ जातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारून निर्बंध लादले होते. आता या समाजाच्या योगदानाचा सन्मान केला जाणार आहे इतर मागास कल्याण विभागाचे मंत्री अतुल जी सावे आणि भटके विमुक्त जातीच्या सर्व संघटनांच्या सहकार्याने हा दिवस साजरा केला जाईल असे डॉ.अंकुश चव्हाण यांनी सांगितले या निर्णयामुळे समाजाला नवी ओळख आणि सन्मान मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# ओम ज्वेलर्सला अचानक भीषण आग अतिक्रमणामुळे अग्निशामक दलाची धावपळ

**जालना । प्रतिनिधी**

**बदनापूर बाजार गल्लीतील ओम ज्वेलर्स येथे आज दुपारी ४ वाजता अचानक शॉर्टसर्किटमुळे आग लागून परिसरात एकच गोंधळ उडाला. काही मिनिटांतच दुकानातून दाट धूर व ज्वाळा उसळल्याने नागरिक व शेजारील व्यापारी घाबरून धावाधाव करू लागले.**



या आगीत दागिने व इतर साहित्य जळून मोठे नुकसान झाले असून प्राथमिक माहितीप्रमाणे हजारोंचा माल खाक झाला आहे. घटना घडताच नगरपंचायतीची अग्निशामक गाडी अवघ्या दहा मिनिटांत दाखल झाली. मात्र बाजार गल्लीतील अतिक्रमणामुळे गाडीस थेट दुकानापर्यंत पोहोचणे अशक्य ठरले. यामुळे पोलिस ठाण्यासमोर गाडी उभी करून तेथूनच पाईप टाकून आग विझवण्याचा प्रयत्न करण्यात आला. जवळपास दीड तासाच्या अथक प्रयत्नानंतर अखेर आग आटोक्यात आणण्यात यश आले. या मोहिमेत मुख्याधिकारी विशाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपंचायतचे रामेश्वर दिगंबर मुळे सर, स्वच्छता निरीक्षक रवी देशपांडे, डॉ. सदाशिव गायकवाड, शशिकांत कांबळे, रशीद मौलाना, मिलिंद दाभाडे आदी कर्मचारी सहभागी झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अतिक्रमणामुळे मदतकार्याला मोठा अडथळा निर्माण झाल्याने संताप व्यक्त होत आहे. नागरिकांनी तातडीने अतिक्रमण हटवावे, अशी मागणी केली आहे.

# सोमवारी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मस्के यांची प्रवचन सेवा



**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे.**

या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २५/८/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प ज्ञानेश्वर महाराज मस्के यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## पान १ वरून...

### मुसळधारने २० लाख एकरवरील

पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरम्यान, या पावसाचा मोठा फटका शेती पिकांना देखील बसला आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात २० लाख १२ हजार एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे राज्यातील १९ जिल्ह्यात २० लाख १२ हजार ७७५ एक्कर क्षेत्रावरील सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासह अन्य पिकांचे नुकसान झाल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम मध्ये पत्रकार परिषदेत बोलताना दिली. राज्यात सर्वाधिक ७ लाख १३ हजार ८५७ एक्कर क्षेत्राचे नुकसान नांदेड जिल्ह्यात झाला असून त्यापाठोपाठ वाशिम जिल्ह्यात ४ लाख ११ हजार ३९२ एकर क्षेत्रावर पिकाचे नुकसान झाले आहे. मात्र क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केल्यास सर्वाधिक नुकसान वाशिम जिल्ह्यात असल्याचही भरणे यांनी सांगितले, या नुकसानीचे पंचनामे सुरू असून अहवाल मिळाल्यानंतर तात्काळ शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे भरणे यांनी सांगितले आहे.

-----------------

### न्यायालयात सरकारी

आहे. या चिट्ठी मध्ये मध्ये काय मजकूर लिहिलेला आहे हे बाहेर आलेले नसल्यामुळे आत्महत्येचे नेमके कारण काय हे उघड झालेले नाही या घटनेची माहिती समजताच डि वाय एस पी चेतना तिडके मॅडम यांनी घटनास्थळाला भेट दिली आहे तसेच वडवणी पोलीस स्टेशनच्या सपोनि वर्षा शिंदे मॅडम याना घटना घडल्याचे समजताच तात्काळ घटनास्थळी पोहचले व घटना स्थळाचा पंचनामा करून मृतदेहचे शवविच्छेदन प्राथमिक आरोग्य केंद्र वडवणी येथे करण्यात आले आहे. तरी वडवणी येथे न्याय मंदिरातच सरकारी वकिलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडल्याने महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

--------------

### बुडीत बँकांतील ठेवी लिक्विडेटरमार्फत

प्रश्न उपस्थित करुन या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले होते. सदर संस्थांविरोधात अनेक तक्रारी आल्यानंतर केंद्रीय निबंधकांनी महाराष्ट्र शासनाच्या निबंधकांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. चौकशी अहवाल समाधानकारक नसल्याने या संस्थांवर बहु-राज्य सहकारी संस्था अधिनियम २००२ अंतर्गत कलम ८६ नुसार विघटन आदेश देण्यात आले असून कलम ८९ नुसार लिक्विडेटर नेमण्यात आले आहे. नेमण्यात आलेले लिक्विडेटर हे संस्थांची चल/अचल मालमत्ता विक्री करून कलम ९० व नियम २० व २९ नुसार ठेवीदारांना पैसे परत करणार असल्याची माहिती देण्यात आली. सरकारने ठेवीदारांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी २०२३ मध्ये बहु-राज्य सहकारी संस्था सुधारणा कायदा लागू केला आहे. यात सहकारी निवडणूक प्राधिकरण, लोकपाल नियुक्ती, पारदर्शक लेखापरीक्षण, नवीन गुंतवणूक मार्गदर्शक तत्वे, संचालक अपात्रता निकष व फसवणुकीवर कठोर कारवाई अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यासह इतर भागातील ठेवीदारांना संस्थांच्या मालमत्तेतून कायदेशीररित्या परतफेड मिळणार असून, सरकारने त्यांच्या हितासाठी ठोस उपाययोजना केली असल्याचे केद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी उत्तरात म्हटले आहे.

-------------

### शंभर कोटीच्या रस्त्यांना मंजुरीच

या गोष्टीला आधार नाही. याबरोबर धानोरा रोड डीपीडीसी कडून मंजूर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती क्रीडा संकुलाच्या परिसरातील रस्ता दर्जेदार व्हावा, नाल्या दर्जेदार व्हाव्यात यासाठी २५ कोटीची तरतूद करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. याबरोबर नाट्यगृहासाठी साडेसात कोटीची तरतूद केली असून या नाट्यगृहाची दुरुस्ती होऊन हे नाट्यगृह सुसज्ज होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. हे सांगत असतानाच बस स्थानकासमोर जाणारा आणि बायपासला जोडणारा रस्ता करण्याची काही लोकांनी घाई केली. त्यामुळे तो रस्ता लहान झाला. परंतु या रस्त्यासाठी आता बजेट येणार असून हा रस्ता मोठा होईल. याबरोबरच शहराच्या दोन्ही बायपासला फ्लाय ओव्हर ब्रीज आणि तीन स्लिप रोड होणार असल्याचेही डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. बीड शहरातील अंकुश नगर रस्त्याला पावणेचार कोटी लागणार असून यालाही आपण मंजुरी घेऊ असेही यावेळी बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले.

-----------------

### बातमीच्या दणक्यानंतर त्या

नसून पुढाऱ्यांची बँक झालेली आहे. त्यामुळे सातत्याने मागणी लावून धरत तेथील संचालक मंडळ अस्तित्वात येऊ दिले नाही. मात्र या ठिकाणी नेमलेले प्रशासकीय अधिकारी बँकेच्या भल्यासाठी लक्ष देत नसल्याचे दिसत आह जिल्हा बँकेच्या प्रशासकीय मंडळाला त्या बँकेच्या आवारात गेल्या दीड वर्षापासून बेकायदेशीर रीतीने मुक्काम ठोकणाऱ्या तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना रोखता आले नाही, ही बाब योग्य नाही. दरम्यान, यात ॲड. देशमुख यांनी सहकार आयुक्त कार्यालय पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनीही लक्ष घातले आहे. एकीकडे दीड वर्षापासून शासनाकडून घर भाडे भत्ता घेणे आणि फुकट रहाणे, याचीही आता चौकशी होईल, असे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

-----------

### राज्यात पाच आयएएस

अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरु असून आणखी ५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यात योगेश कुंभेजकर यांना वाशिमच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अनुक्रमे योगेश कुंभेजकर, वर्षा मीना आणि संजय चव्हाण यांची जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तर, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज), अकोलाच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून भुवनेश्वरी एस. नियुक्ती करण्यात आली. तसेच, रघुनाथ गावडे यांची मुंबईच्या अतिरिक्त मुद्रांक शुल्क नियंत्रक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

---------

### मुलींना शैक्षणिकसह परीक्षा

६० टक्के आहे. ही दरी कमी करण्यासाठी आणि मुलींना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे ते म्हणाले. शैक्षणिक संस्था आकारत असलेली 'इतर शुल्के' विद्यार्थिनींसाठी अडथळा ठरत असल्याने, ही शुल्के माफ करण्याचे नियोजन सुरू आहे, असे पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

सिडनहॅम महाविद्यालयात यास्मिन खुर्शीदजी सर्वेअर यांच्या वाणिज्य पदवीच्या शतकपूर्तीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यास्मिन सर्वेअर या आशिया खंडातील पहिल्या महिला वाणिज्य पदवीधर आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या पहिल्या महिला कर्मचारी होत्या. या वेळी चंद्रकांत पाटील यांनी सावित्रिबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणातील योगदानासह सर्वेअर यांच्या कर्तृत्वाचा गौरव केला.

------------

### बीड एसपी ऑफिस मधील घटना

कार्यालयातील सायबर सेल मध्ये गेले असता या ठिकाणी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी मला तेवढेच काम नाही तुमच्यात दम असेल तर कोणाची तक्रार आहे त्यांच्याबरोबर खेटा असे म्हणत शिवीगाळ केली व बाहेर हाकलून दिले हा प्रकार पोलीस अधीक्षक कार्यालयात घडला यानंतर मोठा जमाव या ठिकाणी जमा झाला त्यांनी पोलीस अधीक्षक यांची भेट देखील घेण्याचे ठरवले प्रामुख्याने ज्या पोलीस अधिकाऱ्याकडून न्यायाची अपेक्षा व्यक्त केली जाते दुसरीकडे खुद्द पोलीस अधीक्षक सर्वसामान्य न्याय मिळावा म्हणून तत्पर असतात मात्र त्यांचेच पोलीस अधिकारी अरेरावी आणि शिवीगाळ करत असतील तर न्याय मागायचा कुठे असाही प्रश्न निर्माण होत आहे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी माऊली शिरसाट व मोहना आघाव यांनी केली आहे.

-----------------

### दुधाला भाव द्या म्हणत

धोरण रचना करावी, अशी मागणी करण्यात आली. राज्यात विविध भागात दुध उत्पादकांचे आंदोलन सुरू आहे. त्यांच्या आंदोलनात सर्वसामान्य शेतकरी देखील सहभागी होत असून दि.१९ रोजी दुध उत्पादकांच्या आंदोलनाच्या समर्थनामधे संसदेच्या दारावर प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले. यावेळी दूध उत्पादक शेतकऱ्यासमोरील आव्हाने कमी करणे व दुधाला दर मिळऊन देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे खा.बरजंग सोनवणे यांनी म्हटले. यावेळी खा.छत्रपती शाहू महाराज, खा.निलेश लंके आणि इतर खासदारांची उपस्थिती होती. खा.बजरंग सोनवणे हे शेती आणि शेतकऱ्यांच्या जोडव्यवसायावर लक्ष ठेवून आहेत. दुध उत्पादक अडचणीत सापडले म्हणून त्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला होता.. दूध हे शेतकऱ्यांसाठी केवळ उत्पादन नसून जोडधंदा आणि जीवन जगण्याचा अविभाज्य घटक आहे. मात्र, आज दुधाला योग्य भाव मिळत नाही, उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने विक्री करावी लागत आहे. दुसरीकडे दुधात भेसळ करणारे लोक सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. या शेतकरी आणि ग्राहकांशी निगडित प्रश्नांवर इंडिया आघाडीच्या खासदारांनी मंगळवारी (दि.१९) संसद भवनासमोर आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.

-------------

### राज्यात पोलीसांची १५ हजार

परीक्षा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सन २०२२ व सन २०२३मध्ये संबंधित पदाची विहित कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना एक वेळची विशेष बाब म्हणून प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता आवेदन अर्ज सादर करण्यास पात्र ठरविण्यात आले आहे. या भरती प्रकियेसाठीही या पूर्वीच्या पोलीस शिपाई भरतीप्रमाणेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.४५० व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.३५० इतके परीक्षा शुल्क आकारण्यास तसेच परीक्षा शुल्क स्वरुपात जमा झालेली रक्कम आवश्यकतेनुसार भरती प्रक्रियेकरीता खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

------

**टी.सी.हरवला आहे**

महेश ज्ञानदेव गवळी या नावाचा १२ पासचा टी.सी. गवळवाडी ते पाटोदा या प्रवासादरम्यान हरवला आहे.ज्या कोणास सापडल्यास खाली पत्त्यावर संपर्क साधावा.

-::संपर्क::-
मो. ७०२०४४८८४९
रा.गवळवाडी ता.पाटोदा जि.बीड

राज्य
# लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २१ ऑगस्ट २०२५


## थोडक्यात...



### मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात सद्भावना दिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

येथील राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात २० ऑगस्ट भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती ही राष्ट्रीय एकता, शांती, सहानुभूती आणि सांप्रदायिक सद्भावना वाढवावा या उद्देशाने सद्भावना दिवस साजरा करण्यात आला.यावेळी राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन द्वारकादास मंत्री माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक लाहोटी सर उपमुख्याध्यापक हावळे सर,पर्यवेक्षक मालपाणी सर तसेच मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सोहनी सर तसेच जेष्ठ शिक्षक तंबरे सर, शिराळकर सर या मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले. भारतातील सर्वात तरुण पंतप्रधान भारतामधील अनेक सुधारणांचे जनक व भारत देशात नविन विचाराची पायाभरणी करणारे पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांना ओळखले जाते. सांस्कृतिक उपप्रमुख श्री बोरासर यांनी सद्भावना दिवसाच्या शपथेचे वाचन केले सर्व विध्यार्थी आणि शिक्षकांनी सामूहिक शपथ घेतली.यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### एड्स जनजागृती या विषयावर व्याख्यान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय आणि राष्ट्रीय शिवाय योजना विभाग यांच्यावतीने रेड रेबल क्लब च्या वतीने एड्स जनजागृती या विषयावर प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक बापू मोक्ष प्राध्यापक बेबी लोखंडे उपस्थित होते चांगले जीवन जगण्यासाठी युवकांनी व्यसनमुक्ती करावी व एड्स जनजागृतीचा प्रसार करावा येडसा महाभयंकर रोगापासून याविषयी समाजात ज्या नकारात्मक विचार आहे हा पुसून काढण्याचा प्रयत्न युवकांनी करावा व यश झालेल्या लोकांना आत्मविश्वासाने जगण्याचे सामर्थ्य द्यावे हीच एड जनजागृती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे असे प्रतिपादन प्राचार्य सोमनाथ घाडगे सर यांनी केली.

### साखरपुढ्याला आले व लग्न लाऊन गेले

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील जयभीमनगर येथे- जाधव व कांबळे परिवाराने एक आदर्श विवाह करताना लग्नाचा खर्चाला फाटा देऊन साखर पुढ्यात लग्न लाऊन समाजा पुढे एक आदर्श निर्माण



केला आहे. येथील झुंबरराव जाधव माजी वाहाक नियंत्रक रा. तालखेड ता. माजलगाव जि.बीड हा.मु.जयभीम नगर माजलगांव भारतभूषन कांबळे रा. शेषनपुरी- ता. माजलगाव जि.बीड या दोन्ही परीवाराचा साक्षगंधा मध्ये- खर्चाला फाटा मारून मंगल परिणय सोहोळा मान्यराच्या उपस्थीत पार पडला या मध्ये, दयानंद स्वामी, विजय साळवे, कचरू तात्या खळगे, धम्मानंद साळवे अशोक पोळ, अमोल डांगरे किसन भरगे राजाभाऊ पोटभरे, रूपचंद कांबळे, जयराम कांबळे तात्या कांबळे,रमेश वाल्मिकी, कैलास वाल्मिकी, जयभीम नगर मधील भिकू कांबळे, नंदु कांबळे, विशाल टाकन कार एम.के. प्रधान. इतर मान्यवराच्या उपस्थितीत संपन्न झाला. बोधचार्य म्हणून शाम वाघमारे यांनी विधी पार पाडला मुक्तिराम ताकट मा. सरपंच गणेश नामदेव, महादेव ताकट, राजाभाऊ ताकट उपस्थीत होते. वंचित बहुजन आघाडीचे अंकुश जाधव, जयराम कांबळे यांनी हा साखर पुढ्यात लग्न लावण्या साठी दोन्ही कुटुंबास मध्यस्थी ची भूमिका घेतली या कार्यक्रमास उषाताई बनसोडे दिपक टाकनकार,अविनाश बनसोडे - दिपक उसबे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे यशस्वी ते साठी विकास मस्के यांनी परिश्रम घेतले.

## आष्टीत न्यु डायमंड बेकरीचे उद्घाटन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टीचे माजी सरपंच सय्यद शफीभाऊ यांचे बंधू उद्योजक सय्यद शहानवाज भाई यांच्या न्यु डायमंड बेकरीच्या उद्धाटन माजी आ.साहेबराव दरेकर,माजी आ. भीमराव धोंडे, राष्ट्रवादीचे नेते शेख महेबुब यांच्या हस्ते झाले.यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख,माजी सरपंच सय्यद शफीभाऊ,जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, नगरसेवक अस्लमभाई बेग, नगरसेवक नाजीम शेख, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,गणेश दळवी,प्रविण पोकळे,शरद रेडेकर, सचिन रानडे, अविनाश कदम, रिजवान शेख, चेअरमन अरुण सायकड,माजी ग्रा.पं.सदस्य रेहान बेग,हाजी सय्यद हाबीबभाई, सय्यद तैय्यब सर, शहादुल्ला बेग टाटा, सदाभाऊ दिंडे, हारुनभाई शेख, आरेफ भाई इतर मान्यवर उपस्थित होते. आष्टीच्या व्यापार पेठेत नवनवीन उद्योगांची संख्या वाढत आहे. काळानुसार तरुणांनी अनेक नवनवीन उद्योग धंद्याकडे वळून बेरोजगारी संपावी असे आवाहन माजी आ. धोंडे,माजी आ. दरेकर यांनी केले. उद्योजक सय्यद शहानवाज यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. उपस्थितीतांचे शफीभाऊ शेख यांनी स्वागत केले.


# परळी शहरातील जुन्या भागात अतिक्रमण जोरात प्रशासन कोमात ?

परळी । प्रतिनिधी

**परळी शहराची जूनी प्रथा आणि परंपरा जोपासत चालू राहिलेले भाग शहरातील जूना गांव भाग म्हणजेच गणेशपार या भागात अतिक्रमनाने थैमान घातला असून या भागात नागरिकाना मोठा त्रास सहन करावा लागत असून प्रशासन मात्र या कडे लक्ष न दिल्याने गाड़ झोपेत असल्याचे चित्र समोर दिसत आहे.**

दरम्यान गणेशपार भागात विविध प्रकारचे दालन आहेत तसेच या भागात अनेक विद्यालय आहेत मोठी वर्दळ राहणाऱ्या या भागात मात्र नागरिकाना मोठा त्रास होत असल्याचे दिसत आहे. रोडवर्ती मोठ्या प्रमानात अतिक्रमण झालेले असून या मुळे दालान मालकाला स्वताची दुचाकी लवण्यास ही जागा राहत नाही तसेच रोडवर आलेले अतिक्रमण या मुळे ट्राफीक सह अनेक बाबीचा त्रास या भागातील नागरिकाना सहन करावा लागत आहे आता येणाऱ्या काळात अनेक सन येत आहेत त्यातच या भागातून पालखी मार्ग आहे





त्या वेळी मोठी अडचन या अतिक्रमना मुळे नाहक त्रास होणार आहे गेल्या अनेक वर्ष पासून या भागात प्रशासक चे लक्ष नसल्याने मोट्या प्रमानात अतिक्रमण वाढले आहे. विशेष बाब म्हणजे गणेशपार ला एक पोलिस चौकी देखील दिलेली असून या चौकी ला कोण्ही वाली नसल्याने शाळा महाविद्यालय सुटल्यास मौकात मजनू देखील हौदोस घालत असून जुन्या गावातील नागरिकातुन तीव्र पड़साद उमटत आहे अनेक निवेदन देऊणही पोलिस चौकी चालू केली नसल्याने या रोड रोमिओ ला जनू की परवाना मिळाल्यागत ते सुसाट वेगाने वाहन चालवने कर्कश अवजाने हॉर्न मुलीची छेड काढने असे अनेक घटना या भागात घडत असल्याच्या घटना वाढत आहेत त्यातच या अतिक्रमण च्या वीळख्याने या भागातील नागरिक हैरान झाले असून न. प. प्रशासन सह पोलीस प्रशासन यांना जाग येईल का या भागातील नागरिकाना मोकळा स्वास घेता येईल का असा संतप्त स्ववाल नागरीकांतून केला जात आहे.

## आष्टीत श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी



म्हसोबावाडी। प्रतिनिधी

**श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आष्टी शहरातील भाजी मंडई जवळील श्री संत सेना महाराज मंदिरात बुधवार दि २० ऑगस्ट रोजी नाभिक समाजाच्या वतीने भक्तिभावाने पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.**

पुण्यतिथी निमित्त मंदिरात श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन केले गेले. या कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी श्री संत सेना महाराज यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि समाजासाठी केलेल्या अमूल्य कार्याचा गौरव केला. संतांच्या विचारांचा प्रसार करण्याचा आणि त्यांच्या आदर्शावर चालण्याचा संकल्पही सर्वांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रविण कदम, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, बाबुराव कदम, पत्रकार गणेश दळवी, कैलास कदम, दिलीप कदम, मारुती जपलवार, बाबासाहेब कदम, गोकुळ राऊत, महादेव कदम, पांडुरंग दळवी, बाळासाहेब कदम, बिबीशन साळुंके, शिक्षक अमोल कदम, सचिन कदम, संजय वखरे, राम कदम, संतोष राऊत, अंबादास कदम, पवन कदम, लखन कदम, विनोद कदम, सागर कदम, हरी कदम, अक्षय कदम, राम कदम, गोविंद कदम, राजेंद्र दळवी, पंडित कदम, संजय पवळ, गणेश राऊत, मनोज कदम, भागवत कदम, महेश कदम, ऋषी कदम, तैनूर शेख, परसुराम चव्हाण, दत्ता कदम आदी मोठ्या संख्येने नाभिक समाजबांधव उपस्थित होते.

## छायाताई मोरे यांचे अल्पशा आजाराने निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील मातोश्री नगर मध्ये वास्तव्यास असणारे दादासाहेब मोरे यांच्या पत्नी छायाताई मोरे गेल्या आठ दिवसापासून अहिल्यानगर येथील



दवाखान्यामध्ये उपचार घेत होत्या मात्र नियतीला वेगळेच काही अघटीत होते उपचारादरम्यान सोमवारी पाहटे त्यांची प्राणज्योत मालवली

त्यांच्या पार्थिदेवर अस्थि शहरातील बस स्थानक लगतच्या स्मशानभूमीत दुपारी साडेबारा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले छायाताई मोरे प्रेमळ स्वभावाच्या सर्वांना आदराने बोलणाऱ्या अशा कॉलनीमधील महिला होत्या त्यांच्या अंत्यविधीला मोठ्या संख्येने महिला भगिनी सगळे सोयरे व्यापारी व मोरे सरांवर प्रेम करणारा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता छायाताई मोरे ह्या आमदार सुरेश आण्णा धस यांचे चुलत बंधू सतीश धस यांच्या सासुबाई होत्या मोरे धस परिरावर छाया ताईच्या जाण्याने जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यातून सावरण्याची ईश्वर त्यांना ताकद देवो छायाताई यांना तीन मुली व एक मुलगा नातू नातवंडे असा यांचा परिवार आहे त्यांचा दशक्रिया विधी निंबोडी येथे २६ ऑगस्ट रोजी होणार आहे.

## पान ६ वरुन...

### बीडमधील मोटार सायकल

ठाणे बीड शहर गु.र. नं ५९/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस ५. पोलीस ठाणे पेठ बीड गु.र. नं १९०/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस ६. पोलीस ठाणे पेठ बीड गु.र.नं २९९/२०२४ कलम ३०३(२) बी.एन.एस ७. पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र. नं ४०३/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस अश्या एकुण ०७ मोटार सायकली किं.अं ४,४०,०००/- रुपयाचे जप्त करुन सदरील मोटार सायकल व दोन आरोपी १. निलेश विष्णु गायकवाड, वय ३३ वर्ष, रा. सुभाष कॉलणी पेठ बीड, २. शिवाजी यलप्पा जाधव, वय ३४ वर्ष, रा डोमरी ता. पाटोदा जि बीड यांना पोलीस ठाणे बीड शहर यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आल्या आहेत.सदरील कामगिरी नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार, आनंद म्हस्के, विकास राठोड, सोमनाथ गायकवाड, राहुल शिंदे, बाळु सानप, अर्जुन यादव, आशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे, चालक नितीन वडमारे, सुनिल राठोड सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

### अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त

पाण्यात गेले असून ऊस देखील बऱ्याचठिकानी खाली पडून शेतकरी बांधवांच्या हाता तोंडाशी आलेला घास निघून गेल्याने शेतकरी बांधव हातबल झालेले असून प्रशासनाने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

### खुनाच्या गुन्ह्यातील

माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्ट्रेशन नंबर १४४/२०२५ ( '''') कलम १०३, १०९, ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), १८९(२), १९०, १९१(२), (३), ३२४(४) भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर प्रकरणातील आरोपी कृष्णा माणिक थावरे याने माजलगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजेश्री परदेशी मॅडम यांच्या न्यायालयात जामीन साठी अर्ज दाखल केला होता सदर प्रकरणात आरोपीच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी कृष्णा माणिक धावरे याचा जामीन अर्ज मा न्यायालयाने मंजूर केला आहे सदर प्रकरणात आरोपी तर्फे ॲड आनंद आबासाहेब देशमुख ॲड शुभांगी आनंद देशमुख यांनी काम पाहिले

### गुत्तेदार आणि प्रशासनाने

असून,याठिकाणी पर्यायी वाहतुक करण्यासाठी नळकांड्या व मुरूम टाकून रास्ता तयार करण्यात आला आहे.सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने मुरूमचा चिखल झाला असून त्यावरून दुचाकी,चार चाकी वाहने घसरून अपघात होत आहेत. आष्टी ते साबलखेड या मार्गावर पाच ठिकाणी शेरी ब्रु,कडा,जळगाव,कासारी नदीवर पूल आहेत. मात्र यापैकी एकाही पुलाचे काम पूर्ण न झाल्याने आश्चर्य व्यक्त केली जात आहे. साबलखेड-आष्टी रस्त्याची गुत्तेदार आणि प्रशासनाने राष्ट्रीय महामार्गाचे वजवाटोळे केले आहे.तरी या रस्त्यांच्या कामांकडे आमदार सुरेश धस यांनी लक्ष घालून हे काम मार्गी लावण्याची सुचना द्याव्यात अशी मागणी जनतेतून होत आहे. आष्टी ते साबलखेड या राष्ट्रीय महामार्गाच्या कामावर बीड येथून अभियंते पाटीलकी गाजवत आहेत. प्रत्यक्ष कामाचा दर्जा पाहण्यासाठी दररोज साइटवर थांबणे बंधनकारक असताना शंभर किलोमीटर वरून या रस्त्याचा दर्जा ते कसे काय राखणार असा सवाल उपस्थित होत आहे. याचाच परिणाम म्हणून या रस्त्याचे काम पूर्ण होण्याअगोदरच शंभर शंभर फूट लांबीच्या भेगा पडल्या आहेत. याशिवाय अनेक ठिकाणी सिमेंट रस्त्यावर पाण्याची योग्य वेळी विल्हेवाट न लावल्याने पाणी तसेच साचून राहत असल्याने अपघातही होत आहेत.कडा ही तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असून इथे दररोज किमान चाळीस गावांचा संपर्क आहे.गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्याचे काम सुरू असल्याने अनेक जण कडा ऐवजी नगर किंवा इतरत्र खरेदीसाठी जात आहेत.शिवाय रस्त्यावरील दुकाने निघाल्याने व नालीच्या अर्धवट कामामुळे दुकानात ग्राहक येत नसल्याने अनेकांनी दुकाने बंद केली आहेत.

### ज्येष्ठ पत्रकार प्रा.

कामांना प्रसिद्धी त्याचप्रमाणे भ्रष्टाचार लाच लुचपत आणि गैरकामाना प्रसिद्धी देऊन अशी कामे रोखण्यासाठी भ्रष्टाचार रोखण्यासाठी त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून पुढाकार घेतला होता प्राध्यापक एस ए सत्तार यांच्या दफनविधी रात्री ९:०० वाजता करण्यात येणार आहे.प्रा.एस.ए.सत्तार यांच्या दुःखद निधनामुळे माजलगावातील एक चांगला पत्रकार काळाच्या पडद्याआड गेला अशा भावना अनेक जण व्यक्त करत आहेत. सत्तार कुटुंबीयांच्या दुःखात दै राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

### डॉ.प्रज्वल उखळीकरची

३ ऑगस्ट रोजी देशभरातील ३०१ शहरांमधील १०५२ परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली होती.या परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एमडी, एमएस, पीजी डिप्लोमा, पोस्ट-एमबीबीएस डीएनबी, सहा वर्षांचा थेट डीआरएनबी तसेच एनबीईएमएस डिप्लोमा अशा पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रियेला लवकरच सुरुवात होणार आहे. ऑल इंडिया कोट्यातील ५० टक्के जागा, डीम्ड आणि सेंट्रल युनिव्हर्सिटीजच्या १०० टक्के जागा आणि ऑल इंडिया ओपन च्या १०० टक्के जागांवर पात्र उमेदवारांना प्रवेश दिला जातो.या परीक्षेत चि.डॉ. प्रज्वल दिनकरराव उखळीकर (जोशी) याने देशातील पहिल्या अकराशे यशस्वितांमध्ये स्थान मिळवले आहे. त्याने लाखोंच्या स्पर्धेत १०९५ वा रॅन्क मिळवत यशाला गवसणी घातली आहे.. चि.डॉ.प्रज्वल हा परळी वैजनाथ येथील पत्रकार प्रा.रविंद्र जोशी यांचा पुतण्या आहे.चि. डॉ. प्रज्वलचे प्राथमिक शिक्षण वसमतनगर येथे तर माध्यमिक शिक्षण परभणी येथे झालेले आहे. त्याचे एमबीबीएस चे शिक्षण तेरणा मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल नवी मुंबई येथे पुर्ण झालेले आहे. जिद्द, अभ्यासातील सातत्य व कठोर मेहनत यातून त्याने हे घवघवीत यश मिळवले आहे. या उत्तुंग यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

----------

## राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदी गणेश म्हेत्रे

वडवणी । प्रतिनिधी

आज वडवणी शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने श्री. गणेश नवनाथ म्हेत्रे यांची आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या सुचनेनुसार वडवणी शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय युवा नेते मा. जयसिंग भैय्या सोळंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करून करण्यात आली.



या सोहळयास वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप,तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, युवक तालुकाध्यक्ष विकास मुंडे, युवा नेते बाबरी मुंडे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी जि.प. सदस्य नवनाथ म्हेत्रे व सर्जेराव आळणे, युवा नेते भारतदादा जगताप, माजी उपसभापती संदिपान आप्पा खळगे, बाजार समिती संचालक सचिन भैय्या लंगडे, अभिमान कदम, गटनेते अस्लम भैय्या कुरेशी, नगरसेवक गुरु प्रसाद माळवदे, नगरसेवक पप्पू ढोले, माजी सभापती महादेव आंबुरे, माजी सरपंच अंगद घुगे, सरपंच दिनकर करांडे, नगरसेवक नागेश डिगे, नगरसेवक बाबा वाघमारे, युवा नेते सतिष खोटे, संचालक नारायण शेळके, संचालक बबन मांजरे, संचालक भिकाराम साळवे, गोविंद बादाडे , राहुल टकले, गुरुप्रसाद डिगे, अभिषेक गुरुसाळी यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.श्री. गणेश नवनाथ म्हेत्रे यांच्या नेतृत्वात शहरात पक्षाचे संघटन, युवकांचा सशक्त सहभाग आणि सामाजिक ऐक्य यासाठी नवनवीन कामांची गती वाढेल. या निवडीबद्दल श्री. गणेश नवनाथ म्हेत्रे यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.



**बीड : योगेश तांबारे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट शिरूर कासार तालुका उपाध्यक्षपदी निवडीचे पत्र देताना आमदार संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, विधानसभा अध्यक्ष मदन जाधव, शामराव तुपे उपस्थित होते.**

## धनगरजवळका, इंचरणा, लांबरवाडी, भुरेवाडी, सौताडा तलाव ओव्हरफ्लो



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात मे महिन्यात झालेल्या पावसामुळे मंगेवाडी.भायाळा तलाव ओव्हरफ्लो झाले होते तर दि.१४ ऑगस्ट रोजी झालेल्या पावसामुळे पाटोदा शहराला पाणीपुरवठा करणारा महा सांगवी तलाव.व दासखेड तलाव हे ओव्हरफ्लो झाले आहेत .तर दि.१७ पासुन सुरु असलेल्या पावसामुळे धनगरजवळका, इंचरणा, लांबरवाडी, भुरेवाडी, सौताडा, तलाव ओव्हरफ्लो झाले आहेत याबाबत अधिक माहिती अशी की तालुक्यात मे महिन्यामध्ये बहुतांशी ठिकाणी जोराचा पाऊस झाल्यामुळे तालुक्यातील मंगेवाडी तलाव दि.२७/५/२०२५ रोजी व भायाळा तलाव दि.१/६/२०२५ रोजी ओव्हरफ्लो झाले होते तर दि.१४ ऑगस्ट रोजी झालेल्या पावसामुळे महासांगवी तलाव व दासखेड तलाव हे ओव्हरफ्लो झाले आहेत तर दि.१७ रोजी झालेल्या पावसामुळे धनगरजवळका, इंचरणा, लांबरवाडी, भुरेवाडी, सौताडा तलाव ओव्हरफ्लो झाले आहेत तर इतर तलावातील पाणी साठा याप्रमाणे पाचंग्री.झिरो टक्के. वसंतवाडी.६२ टक्के पाणी आलं असून अशी माहिती पाटबंधारे विभागाने दिली आहे.

## आज मिसाळवाडी येथे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मिसाळवाडी मौजे अंमळनेर येथे परम पुज्य गुरुवर्य संत वामनभाऊ व ऐश्वर्य संपन्न संत भगवान बाबा यांच्या कृपा आशिर्वादाने दि.१४/०८/२०२५ ते २१/८/२०२५ दरम्यान सुरुवात झालेल्या अखंड हरिनाम सप्ताह,श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व शिवपुराण कथा,ज्ञानयज्ञ सोहळ्याची सांगता आज दि.२१/८/२०२५ गुरुवार रोजी सकाळी ७:३० ते ८:३० या दरम्यान महंत विठ्ठल महाराज शास्त्री श्री.क्षेत्र गहिनीनाथगड चिंचोली (नाथ) यांच्या सुश्राव्य काल्याच्या किर्तनाने होणार असून या किर्तनाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थ मिसाळवाडी यांनी केले आहे.या सप्ताह सोहळ्यात दररोज दुपारी २:०० ते ५:०० या वेळेत भागवताचार्य तथा रामायणाचार्य स्वररत्न ह.भ.प. अंजलीताई केंद्रे उदगीरकर यांची शिवपुराण कथा आयोजित केली होती.या शिवपुराण कथेला भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन शिवपुराण कथेच्या श्रवणाचा लाभ घेतला.





## आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने महाकाय कॅमेऱ्याचे पूजन

आष्टी । प्रतिनिधी

मंगळावर दिनांक १९ ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने तब्बल १२ फुटी महाकाय कॅमेऱ्याचे पूजन करून जागतिक छायाचित्र दिन साजरा करण्यात आला.

आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने दरवर्षी विविध उपक्रम राबवून हा दिवस साजरा करण्यात येतो.यंदा १२ फूट उंचीच्या कॅमेराची प्रतिकृती साकारून तालुक्यातील शंभरहून अधिक फोटोग्राफर बांधवांच्या तसेच युवा नेतृत्व जयदत्त धस यांच्या उपस्थितीत हा अविस्मरणीय सोहळा संपन्न झाला.यावेळी आधुनिक काळासोबत नवनवीन तंत्रज्ञानांची जोड देऊन या व्यवसायाने भरारी घेतली असून यामध्ये आता स्पेशलायझेशन देखील झाल्याने ज्याच्या नजरेची तीक्षता आणि बौद्धिक कल्पकता आहे असाच फोटोग्राफर तो क्षण टिपण्याचा प्रयत्न करतो.शिवाय आपल्या आयुष्यातील क्षण साठवून ठेवण्याचं काम आपण करत असतो त्यामुळे सर्वांनी या कलेला व्यावसायिक रूप न देता कलेप्रती आदर दाखवून ही कला जोपासली तर आपली आर्थिक उन्नती देखील आपोआप होत राहते असे मत सर्व उपस्थित फोटोग्राफर बांधवांनी व्यक्त केले.यावेळी तालुक्यातील आजी माजी फोटोग्राफर, व्हिडिओग्रफार मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

# आधुनिक ई-पॉस यंत्र न बसविल्यास दुकानाला टाळे

## राज्यातील साडेसात हजार खत विक्रेत्यांना कृषी विभागाचा इशारा

पुणे : राज्यात अनुदानित खत विक्री करण्यासाठी कृषी विभागाकडून विक्रेत्यांना आधुनिक ई-पॉस यंत्राचे बंधन करण्यात आले असले तरी सुमारे साडेसात हजार विक्रेत्यांनी या आदेशाला केराची टोपली दाखविली आहे. या केंद्रांनी ई-पॉस यंत्र बसविण्यासाठी महिनाभरापासून कृषी विभाग प्रयत्नशील आहे. त्यासाठी देण्यात आलेली मुदतही वाळविली. मात्र, २० ऑगस्टपर्यंत यंत्रे न बसविल्यास खतविक्रीच्या ही दुकानांना टाळे बसणार असल्याचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

कृषी विभागाने किरकोळ रासायनिक खत विक्रेत्यांना अनुदानित रासायनिक खतांची विक्री ई-पॉस यंत्रांच्या माध्यमातून करणे बंधनकारक केले आहे.

तसेच खतविक्रीच्या नोंदी तत्काळ आणि अचूक पद्धतीने या यंत्रांमध्ये समाविष्ट करण्यासाठी ई-पॉसमधील साठा व प्रत्यक्ष साठा समान असणे



गरजेचे आहे. यासाठी विक्रीची नोंद आयएफएमएस या प्रणालीमध्ये तत्क्षणी घेणे सुद्धा बंधनकारक केले आहे. याबाबत नियमित तपासणी करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील खत निरीक्षकांना निर्देश दिले. ज्या विक्रेत्यांकडे ई पॉसवरील खत साठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये फरक आढळेल, अशा विक्रेत्यांवर कारवाई करून परवाना रद्द करण्याबाबत अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, असेही किरनळ्ळी यांनी स्पष्ट केले.

नवीन ई पॉस मशीन उपलब्ध

राज्यात सध्या ३० हजार खत विक्री दुकाने असून एकूण ३४ हजार ४६३ एल १ सिक्युरिटी नवीन ई पॉस मशीन उपलब्ध केले आहेत. यातील २८ हजार ५१६ दुकानांमध्ये हे यंत्र बसविली आहेत. ज्या विक्रेत्यांनी अद्याप नवीन यंत्र घेतलेले नाहीत, अशांनी संबंधित जिल्ह्यातील कृषी विकास अधिकारी यांच्यांशी संपर्क साधून १० ऑगस्टपूर्वी यंत्र सुरू करावे, असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले होते. या विक्रेत्यांना आता कृषी विभागाने २० ऑगस्ट पर्यंतची मुदत दिली होती. यंत्र न बसविल्यास या दुकानांना टाळे लागणार असून त्यांना खत विक्री करता येणार नाही.

## मोसंबीवरील सायला, काळी व पांढरी माशी नियंत्रणाचे उपाय

सध्या मोसंबी आणि संत्र्या बागांवर सध्या अनेक किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहे. त्यावर काही उपायायोजना करण्याची गरज आहे.

मोसंबी आणि संत्र्याच्या बागेत अचानक पाने वाकडी होणे, चिकट थर दिसणे आणि काळसर बुरशी वाढणे ही कीटक हल्ल्याची लक्षणे असू शकतात. सायला, काळी व पांढरी माशी या कीटकांचा प्रादुर्भाव वेळेवर ओळखून उपाययोजना केल्यास उत्पादन व गुणवत्ता दोन्हीचे संरक्षण करता येते. मोसंबी व संत्र्याच्या उत्पादनावर विविध किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत असतो. त्यापैकी सायला, काळी माशी आणि पांढरी माशी या तीन किडी अत्यंत हानीकारक आहेत. योग्य वेळी लक्ष न दिल्यास पिकांचे उत्पादन आणि गुणवत्तेत लक्षणीय घट होते.

सायला : ओळख आणि लक्षणे : पानांच्या खालच्या बाजूस. रस शोषून घेतल्यामुळे पाने वाकडी होतात, कोवळ्या कोंबांवर चिकट पदार्थ तयार होतो. या पदार्थावर काळसर बुरशी वाढते आणि पाने काळी पडतात. काळी व पांढरी माशी : पानांच्या खालच्या बाजूस. माश्या रस शोषून घेतात आणि पानांवर व फळांवर चिकट पदार्थ निर्माण करतात. त्यावरही काळी बुरशी वाढून पाने व फळे काळसर पडतात, झाडाची प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया कमी होते.

नियंत्रण उपायायोजना : शेतात तण नियंत्रण आणि झाडांची नियमित छाटणी. संतुलित खत व्यवस्थापन, विशेषत: नायट्रोजनचे संतुलित प्रमाण. प्रादुर्भाव दिसताच प्रतिबंधात्मक फवारणी. शिफारस केलेल्या कीटकनाशकांचा वापर. प्रभावित पाने छाटून नष्ट करणे. फेरोमोन सापळे लावून प्रादुर्भाव कमी करणे. शिफारस केलेल्या कीटकनाशकांची फवारणी. सतत झाडांची पाहणी करा. पिकामध्ये हवेशीर वातावरण राहील यासाठी झाडांची योग्य छाटणी करा. पाणी व खतांचे योग्य व्यवस्थापन ठेवा. कीटकनाशके नेहमी शिफारस केलेल्या प्रमाणात आणि योग्य वेळेतच वापरा.



## सोयाबीन, ज्वारी, ऊस, फळबाग शेतकऱ्यांसाठी कृषी विद्यापीठाचा विशेष सल्ला



परभणी : प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या माहितीनुसार मराठवाड्यात सर्वत्र पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मुसळधार पावसामुळे शेतात व फळबागेत पाणी साचू नये याची दक्षता घ्यावी. फवारणीची कामे २ दिवस टाळावीत किंवा पावसाची उघडीप बघूनच करावीत. सोयाबीन : अतिरिक्त पाणी साचू देऊ नये. पाने खाणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्क / अझाडिरेक्टिन १५०० फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त असल्यास शिफारसीतील रासायनिक कीटकनाशके आलटून-पालटून वापरावीत. पांढरी माशीसाठी प्रति एकरी १० पिवळे चिकट सापळे लावावेत. पिवळा मोझॅक रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत.


खरीप ज्वारी : अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टिन बेन्झोएट ५% किंवा स्पिनेटोरम ११.७% एससी फवारणी करावी. बाजरी : शेतात पाणी साचू नये याची काळजी घ्यावी. ऊस : पांढरी माशी व पाकोळीसाठी लिकॅनीसिलियम लिकॅनी (जैविक बुरशी) फवारणी करावी. क्लोरोपायरीफॉस / इमिडाक्लोप्रिड / ॲसीफेट. पोक्का बोइंग रोगसाठी कार्बेन्डाझिम + मॅन्कोझेब किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड फवारणी करावी. हळद : अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. पानावरील ठिपके व करपा नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम + मॅन्कोझेब.

कंदमाशी नियंत्रणासाठी क्विनालफॉस किंवा डायमिथोएट आलटून पालटून वापरावेत. संत्रा/मोसंबी : पाण्याचा निचरा करावा. किडींकरिता डायकोफॉल फवारणी. फळवाढीसाठी ००:५२:३४ खत + जिब्रॅलिक ॲसिड फवारणी. डाळींब : अतिरिक्त फुटवे काढावेत. १९:१९:१९ खत सूक्ष्म सिंचनाद्वारे द्यावे. चिकू : पाण्याचा निचरा करावा. भाजीपाला : पाणी साचू नये याची दक्षता घ्यावी. काढणीस तयार पिके लगेच काढावीत. शेंडा व फळ पोखरणारी अळी प्रादुर्भावग्रस्त फळे नष्ट करावीत. कामगंध सापळे / शिफारसीतील कीटकनाशकांचा वापर करावा. भेंडीवरील पावडरी मिल्ड्यू रोगासाठी मायक्लोब्यूटॅनिल फवारणी. फुलशेती : पाणी साचू नये याची काळजी घ्यावी. काढणीस तयार फुलांची काढणी करावी. तुती रेशीम उद्योग : योग्य आकाराचे संगोपन गृह ठेवावे. प्रति एकर ५ पिल्ले पालन करून दरवर्षी १० क्विंटल कोष उत्पादन शक्य. योग्य व्यवस्थापन केल्यास प्रति एकर ५ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकते. पशुधन व्यवस्थापन : पावसाळ्यात कोंबडी व शेळ्यांना नियमित लसीकरण करावे. शेळ्यांसाठी निवारा असलेले शेड बांधावे. शेडमध्ये स्वच्छता व जैवसुरक्षा काटेकोर पाळावी.

## कापसावरील मग रोग आणि उपाय

सततच्या पावसामुळे कापूस पिकामध्ये पाणी साचल्यामुळे कापसाच्या झाडाची पाने मलूल होऊन झाडाने मान टाकल्यासारखी लक्षणे दिसत आहेत. ही आकस्मिक मर विकृती असून यामुळे प्रादुर्भाग्रस्त झाडे पूर्णत: वाळण्याची शक्यता असते.

जमिनीत वाफसा नसल्यामुळे आकस्मिक मर प्रादुर्भावग्रस्त झाडांमध्ये मुळाद्वारे अन्नद्रव्ये शोषण होत नाही. त्यामुळे झाडे कोमेजतात. पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासांत आकस्मिक मर ची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते. सततचा व मोठा पाऊस आणि जमिनीत वाफसा नसणे व हवेतील आर्द्रता जास्त झाल्यामुळे अशा प्रकारची लक्षणे दिसतात. तसेच सततच्या पावसामुळे जमीनीमध्ये वाफसा परिस्थिती नसल्यामुळे कापसाच्या मुळामध्ये बुरशीची वाढ होऊन रसवाहिनी बंद होऊ शकतात. यालाच बुरशीजन्य मर असे म्हणतात. त्यामुळे कापूस पिकावर अशा प्रकारची आकस्मिक मर विकृती किंवा बुरशीजन्य मर रोगाची लक्षणे दिसून आल्यास खालीलप्रमाणे व्यवस्थापन करण्याचा सल्ला वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाच्या नांदेड येथील कापूस संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. अरविंद पंडागळे यांनी दिला आहे.



कसे कराल उपाय?

शेतातील साचलेले पाणी चर काढून त्वरीत शेताबाहेर काढावे. कॉपर ऑक्सीक्लोराइड २५० ग्रॅम + २ किग्रॅ युरिया + १ किग्रॅ पांढरा पोटॅश (००:००:५०) १०० लिटर पाण्यात घेऊन झाडाच्या बुंध्याशी फवारणी पंपाद्वारे किंवा डबा/बाटली/मगाद्वारे आळवणी (ड्रेचिंग) करावी. प्रत्येक प्रादुर्भावग्रस्त झाडास जवळपास १०० मिली द्रावण पडेल याप्रमाणे आळे/बांगडी पद्धतीने आळवणी करून झाडाच्या बुंध्याजवळील माती व्यवस्थित दाबून घ्यावी. किंवा पोटॅशियम नायट्रेट (१३:००:४५) हे विद्राव्य खत ५०० ग्रॅम + कोबाल्ट क्लोराईड १ ग्रॅम यांचे १०० लिटर पाण्यात मिश्रण तयार करून द्रावणाची प्रति झाड १०० मिली द्रावणाची आळवणी (ड्रेचिंग) करावी. वरीलप्रमाणे द्रावणाची आळवणी म्हणजेच ड्रेंचींग करावी. फवारणी करू नये. आळवणी न करता फवारणी केल्यास फायदा होणार नाही. पाणी साचलेल्या कपाशी पिकात मरग्रस्त झाडे आढळून आल्यास झुकलेली झाडे मातीचा भर देऊन सरळ करावीत. कपाशीच्या झाडांचे खोड हवेमुळे ढिले पडल्यास दोन पायाच्या मध्ये घेऊन व्यवस्थित दाबून घ्यावीत. शेतजमीन वाफश्यावर आल्यानंतर हलकी आंतरमशागत करून कापसाच्या मुळांना हवा खेळती ठेवावी म्हणजे झाडे लवकर पूर्ववत होतील.

वरील सर्व उपाययोजना कापसाच्या शेतामध्ये झाडे मर होत असलेली दिसताच त्वरीत (२४ ते ४८ तासाच्या आत) कराव्यात. जेणेकरून पुढील होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल. व्यवस्थापनास जेवढा उशीर होईल तेवढा फायदेशीर परिणाम कमी होईल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४१ : जॉन हॅम्प्टन यांनी व्हेनेशियन शैलीच्या खिडकीचे पेटंट केले.
१८८८ : विल्यम बरोज याने बेरजा मारणार्या यंत्राचे पेटंट घेतले.
१९११ : पॅरिसच्या लुव्र या संग्रहालयातुन लिओनार्डो-द-व्हिन्सी याचे 'मोनालिसा' हे जगप्रसिद्ध चित्र चोरीला गेले.
१९१५ : पहिल्या महायुद्धा दरम्यान इटलीने तुर्की विरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९३८ : इटली देशांतील शाळांमध्ये ज्यू शिक्षकांवर बंदी घालण्यात आली.
१९६५ : रोमानियाने संविधान स्वीकारले.
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायद्यास मान्यता मिळाली.
१९८८ : भारत आणि नेपाळ यांच्या सीमेवर आलेल्या तीव्र स्वरूपाच्या भूकंपामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले.
१९९१ : लाटव्हियाने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९३ : मंगळाच्या शोधमोहिमेसाठी पाठवण्यात आलेल्या 'मार्स ऑब्झर्व्हर' या यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६५ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २० जून १८३७)
१७८९ : ऑगस्टिन कॉशी फ्रेन्च गणितज्ञ (मृत्यू: २३ मे १८५७)
१८७१ : गोपाळ कृष्ण देवधर भारत सेवक समाजाचे एक संस्थापक सदस्य, 'सेवासदन' या संस्थेचे शिल्पकार, सहकारी चळवळीचे आद्य समर्थक (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९३५)
१९०५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते बिपीन गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९८१)
१९०७ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. जीवनवंश यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९६५)
१९०९ : नागोराव घन:श्याम तथा 'ना. घ.' देशपांडे कवी (मृत्यू: १० मे २०००)
१९१० : नारायण श्रीधर बेन्द्रे आदिम कलेपासून चिनी चित्रकलेपर्यंत अनेक शैलीविशेष आत्मसात केलेले चित्रकार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९२)
१९१५ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक कादंबरीकार, लघुकथा लेखक, आणि चित्रपट निर्माता इस्मत चुग़ताई यांचा जन्मदिन.
१९२२ : अमेरिकन खजिनदार शोधक आणि मेल फिशर मरीन हेरिटेज म्युझियमचे संस्थापक मेल फिशर यांचा जन्मदिन.
१९२४ : श्रीपाद अच्युत दाभोळकर 'प्रयोग परिवार' या संकल्पनेचे प्रवर्तक, गणितज्ञ आणि जमनालाल बजाज पुरस्काराने गौरवण्यात आलेले कृषीशास्त्रज्ञ (मृत्यू: ३०एप्रिल २००१)
१९२७ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, समाजवादी राजकारणी आणि उत्तरप्रदेश, उडीसा आणि पश्चिम बंगाल राज्याचे माजी राज्यपाल बी. सत्य नारायण रेड्डी यांचा जन्मदिन.
१९३४ : सुधाकरराव नाईक प्रसिद्ध भारतीय राजकारणी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य तसचं, महाराष्ट्र राज्याचे माजी १३ वे मुख्यमंत्री (मृत्यू: १० मे २००१)
१९३९ : बोत्स्वानाचा राष्ट्राध्यक्ष फेस्टस मोगे यांचा जन्म.
१९६१ : व्ही. बी. चन्द्रशेखर भारताचा फिरकी गोलंदाज
१९७१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी आणि अरुणाचल प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री पेमा खांडू यांचा जन्मदिन.
१९७३ : गूगल चे सहसंस्थापक सर्गेइ ब्रिन यांचा जन्म.
१९८१ : कनेक्ट्यू चे सहसंस्थापक कॅमेरॉन विंकल्वॉस यांचा जन्म.
१९८६ : उसेन बोल्ट जमैकाचा धावपटू. यांनी अनेक विश्व विक्रम आपल्या नावे केली आहेत.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३१ : 'गायनाचार्य' पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८७२)
१९४० : लिऑन ट्रॉट्स्की रशियन क्रांतिकारक (जन्म: ७ नोव्हेंबर १८७९)
१९४७ : बुगाटी कंपनी चे संस्थापक इटोर बुगाटी यांचे निधन. (जन्म: १५ सप्टेंबर १८८१)
१९७६ : पांडुरंग सातू नाईक आल्हाददायकता, कल्पकता व वास्तवता ही वैशिष्ट्ये असलेले चित्रपट छायालेखक
१९७७ : प्रेमलीला ठाकरसी एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलगुरू
१९८१ : आचार्य दत्तात्रय बाळकृष्ण तथा 'काकासाहेब' कालेलकर गांधीवादी देशभक्त, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, इतिहासकार, बहुभाषा कोविद, रसिक, सखोल चिंतक, गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू (१९२८), राज्यसभा सदस्य (१९५२ १९५८), अनुसूचित जमातींच्या आयोगाचे अध्यक्ष (१९५३), गुजराथी साहित्यपरिषदेच्या अहमदाबाद अधिवेशनाचे अध्यक्ष (१९५९), हिन्दी विश्वकोश निर्मिती समितीचे सदस्य, साहित्य अकादमी पारितोषिक (१९६६) व फेलोशिप (१९७१) विजेते, पत्रकार व गुजराथी साहित्यिक(जन्म: १ डिसेंबर १८८५ सातारा, महाराष्ट्र)
१९९१ : गोपीनाथ मोहंती ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ओरिया साहित्यिक (जन्म: २० एप्रिल १९१४)
१९९५ : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय-अमेरिकन खगोल वैज्ञानिक व गणिती. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. यांचे काका सी. व्ही. रामन यांनाही भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक (१९३०) मिळाले आहे. भौतिकशास्त्रात नोबेल मिळवणारे हे दोघेच भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. जन्म: १९ आक्टोबर १९१०)
२००० : निर्मला गांधी समाजसेविका, महात्मा गांधींच्या स्नुषा (जन्म:)
२००० : विनायकराव कुलकर्णी स्वातंत्र्यलढ:यातील व गोवा मुक्तीसंग्रामातील प्रमुख सेनानी आणि समाजवादी विचारवंत (जन्म:)
२००१ : मराठी रंगभूमीचा वारकरी म्हणून गौरविले गेलेले शं. ना. तथा दादासाहेब अंधृटकर (जन्म:)
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२००४ : भारतीय उडिया भाषा कवी सच्चिदानंद राऊत यांचे निधन. (जन्म: १३ मे १९१६)
२००६ : बिस्मिला खाँ भारत रत्न, पद्मश्री व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शहनाई वादक (जन्म: १९१६)
२००७ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक लेखिका कुर्रतुलऐन हैदर यांचे निधन.

# गणेशोत्सव -ईद ए मिलाद सण जबाबदार नागरिक म्हणून साजरा करा-जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

आगामी कालावधीत येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद ए मिलाद हे सण सर्व नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक शांतता सलोखा अबाधित ठेवत हे सण आनंदाने आणि शांततेत साजरे करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित गणेशोत्सव शातंता समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी जॉन्सन बोलत होते. यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा अधिक्षक कार्यालयातील अतिरिक्त पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, तहसीलदार, मुख्याधिकारी, पोलीस निरीक्षक, तसेच आरोग्य, अग्निशमन, वीज वितरण, पाणीपुरवठा, परिवहन व नगरपरिषद यासारख्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी व समाजातील मान्यवर नागरिकही या बैठकीस उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री जॉन्सन म्हणाले की, गणेशोत्सव हा सामाजिक एकोप्याचा आणि श्रद्धेचा सण आहे. प्रशासन आणि गणेश मंडळांनी परस्पर समन्वयाने उत्सव सुरळीत पार पाडावा. या पार्श्वभूमीवर उत्सव काळात शांतता, सौहार्द व कायदा-सुव्यवस्थेची योग्य अंमलबजावणी व्हावी. गणपती उत्सव आणि ईद ए मिलाद हे सण एकात्मतेने जबाबदार नागरिक म्हणून साजरा करावेत. यावर्षीचा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा होणार असून, उत्कृष्ट देखावे, पर्यावरणपूरक गणेश मुर्ती, निर्माल्य विसर्जन हे व्यवस्थित कचरा न होता करावेत. तसेच ध्वनी प्रदूषण, विजेची सुरक्षितता, स्वच्छता आणि वाहतुक व्यवस्था आदींचे योग्य नियोजन करावे.तसेच गणेशोत्सवाच्या उत्कृष्ट देखाव्यास पु.ल. देशपांडे अकादमी तर्फे प्रथम, द्वितीय आणि तृतीय पुरस्कार देण्यात येणार असून, बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांनी उत्कृष्ट देखावे, स्वच्छता पाळून बक्षिस जिंकण्याचा प्रयत्न करावा. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयीन यंत्रणेने सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट ठेवावी. संवेदनशील भागांमध्ये विशेष पोलीस बंदोबस्त ठेवून सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवावी. वाहतूक शाखेने मिरवणुकांच्या मार्गावर विशेष लक्ष ठेवावे. नगरपरिषद व ग्रामपंचायत विभागांनी स्वच्छता ठेवावी. दिवाबत्ती आणि विसर्जन स्थळांवरील सुविधा वेळेत पूर्ण कराव्यात. तसेच आरोग्य विभागानेही वैद्यकीय पथके तैनात ठेवावीत. गणपती स्थापनेच्या दिवशीची आणि गणपती विसर्जनाच्या दिवशीची वाहने सुस्थितीत असल्याची तपासणी करुनच वापरण्यात यावीत. विजेच्या लोबंकळणाऱ्या तारा, विजेचे वाकलेले खांब हे सुस्थितीत करुन घ्यावेत. गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यासाठी विहीरी अधिग्रहीत कराव्यात. तसेच विहीरीत पुरेसे पाणी आहे की नाही, हे पण तपासून पाहावे. गणेश मंडळानी ऑनलाईन परवाना घेवून गणपती स्थापन करावेत. ग्रामीण भागात तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे परवानगीसाठी रितसर अर्ज करावेत. डिजेचा आवाज व लाईटींगचा प्रकाशासाठी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणेच ठेवावा. जेणे करुन वृध्द आणि आजारी व्यक्ती, लाहन बालकांना त्रास होणार नाही. सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या योग्यप्रकारे पार पाडाव्यात आणि एकमेकांशी समन्वय ठेवत हे उत्सव शांततेत पार पाडावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जॉनसन यांनी यावेळी केले.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी बैठकीपूर्वी शासन निर्णयानुसार गणपती उत्सव कसा साजरा करावा याची माहिती दिली. यावेळी बैठकीस विविध विभागातील अधिकारी, गणेश मंडळाचे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य व इतर सदस्यांची उपस्थिती होती.

## कृषीदुतांकडून मोराळा येथे बोर्डेक्स पेस्टचे यशस्वी प्रात्यक्षिक




आष्टी । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत श्री छत्रपती शाहू, फुले,आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी येथील कृषी दुतांनी मौजे मोराळा येथे ग्रामस्थांसाठी बोर्डेक्स पेस्ट प्रात्यक्षिकाचे यशस्वी आयोजन केले या उपक्रमात कृषी दुतांनी गावकऱ्यांना बोर्डेक्स पेस्ट कसे तयार करावे त्याचे फायदे आणि शेतीत त्याचा प्रभावी वापर कसा करावा याची सविस्तर माहिती दिली बोर्डेक्स पेस्ट हे पिकांसाठी एक महत्त्वाची बुरशीनाशक असूनते पिकांचे विविध रोगांपासून संरक्षण करून उत्पादन वाढीस हातभार लावते विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे हे पेस्ट तयार करण्याची सांगितल्याने गावकऱ्यांनी त्यात पद्धत समजावून विशेष रुची दाखवली.

शेतकऱ्यांनी या प्रात्यक्षिकाचा उपयोग करून आपल्या शेतात बोर्डेक्स पेस्ट तयार करून वापरण्याची तयारी दर्शवली यामुळे त्यांच्या कृषी ज्ञानात भर पडल्याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले हा उपक्रम गावकऱ्यांसाठी अत्यंत लाभदाय ठरला असून यामुळे त्यांच्या शेतीतले ज्ञान अधिक प्रगल्भक होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरसूळ. एस.आर, कार्यक्रमाचे समन्वयक प्राध्यापक तांबोळी आय. एम., उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक मिसाळ एल. एस आणि विषय तज्ञ प्राध्यापक साबळे एम व्ही. यांचे मार्गदर्शन लाभले यावेळी कृषी दुत शिंदे पृथ्वीराज, राठोड शुभम, कांबळे अनिकेत, ससाणे सुमेध,गीते सुजित,अजय जेडिया,पठारे विनोद, सुरेशकुमार, फुलमाळी सागर उपस्थित होते कृषी दुतांकडून दाखवलेल्या या सक्रिय सहभागामुळे कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना योगदानाला प्रोत्साहन मिळाले.

## चारा लागवडीची ॲड. निलेश हेलोंडे यांच्याकडून पाहणी



बीड । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्यासाठी मिशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या पाली येथील चारा लागवडीच्या उपक्रमाला कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करत समाधान व्यक्त केले. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी श्री. थोरात, गट विकास अधिकारी श्री. राठोड, ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्यासह महसूल मंडळ अधिकारी पाली, श्रीमती चाटे, ग्राम महसुल अधिकारी अनिल गायकवाड, ग्रामसेवक शंकर वाघमारे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की, गायरान जमिनीवर चारा लागवड करुन, शेतकरी कुटूंबांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शाश्वत अर्थिक उत्पन्नासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अनेक कुटूंबाकडे चारा लागवडीसाठी स्वत:ची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करून त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा चाऱ्यासाठी होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कमी जागेतही भरपूर उत्पादन घेता येते. यामुळे चारा टंचाईवर मात करता येईल. तसेच पशुधनाचे पोषण व्यवस्थित होईल तसेच रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत. तसेच पाऊस कमी पडल्यास या क्षेत्रास पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी ॲड हेलोंडे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेत. मिशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देवून, शेतकऱ्यांनी त्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. त्यांनी विशेषतः सामुदायिक स्तरावर चारा लागवड, साठवणूक केंद्रांची उभारणी, जलसंधारणाच्या उपाययोजना व पाणी बचतीच्या आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्याचे महत्व अधोरेखित केले. तसेच त्यांना चारा लागावडीकरीता प्रोत्साहित केले.

## पन्नगेश्वर कारखान्याकडील थकीत पैसे मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार-भाई मोहन गुंड

बीड । प्रतिनिधी

मागिल दोन वर्षा पासुन बंद असलेल्या आणि कुणाला ही विश्वासात न घेता परस्पर विक्री केलेल्या पानगांव ता. रेणापूर येथील पन्नगेश्वर साखर कारखाण्यातील शेतकऱ्यांच्या शेअर्सची रक्कम,कर्मचारी यांचा हक्काचा पगार,ऊसतोड कामगारांचे कष्टाचे संपूर्ण पैसे मिळवुन देणार असल्याचे आणि त्या करिता पैसे मिळे पर्यंत कर्मचारी, शेतकऱ्यां सोबत लढा देणार असल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे नेते मोहन गुंड यांनी कारखान्यावर सुरू असलेल्या अंदोलकाना मार्गदर्शन करताना प्रतिपादन केले आहे.




इ.स.१९९९ मध्ये स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी पन्नगेश्वर कारखाण्याची स्थापना केली तेव्हां पासूनकै.गोपीनाथराव मुंडे साहेब हयात असेपर्यंत कर्मचाऱ्यांचे पगार नियमीत होत होते. कारखाना बंद पडण्यापुर्वी तीन वर्षापासून कर्मचाऱ्यांचे पगार, ग्रॅज्युटी व पी.एफ बाबत अनियमीतता झाली. तसेच सदर कारखान्याकडे कर्मचाऱ्यांचे हक्काचे तीन वर्षाची पगार, ग्रॅज्युटी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी ( पी. एफ )येणे बाकी आहे.त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. मुला बाळाचे लग्न मोडले, शिक्षणापासून मुल वंचीत राहण्याची वेळ आली. यामुळे कर्मचाऱ्यांनी पुर्वीच्या व्यवस्थापनाकडे वेळोवेळी निवेदन देऊन अनेक वेळा अंदोलने ही केली तरीपण त्यांच्या मागण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले व कोणासही माहिती न होऊ देता व कर्मचारी, कामगार यांच्या थकीत वेतनाची तरतुद न करता अंबाजोगाई येथील विमल ॲग्रो फुड्स प्रा. ली. या कंपनीस कवडीमोल किमतीत कारखान्याची विक्री केली गेली. येथील कामगार, कर्मचारी यांचे हक्काचे थकीत रक्कम न देता कारखान्याची विक्री व हस्तांतरण झाले आहे. या विरोधात कारखान्याच्या मुख्य गेटवर पन्नगेश्वर शुगर मिल्स या साखर कारखान्याच्या कर्मचाऱ्यांनी १३ ऑगस्ट पासून साखळी उपोषण सुरू केले आहे. सोमवारी ता. १८ रोजी शेतकरी कामगार पक्षाचे नेते मोहन गुंड यांनी उपोषण स्थळी भेट देऊन कारखाण्यातील शेतकऱ्यांच्या शेअर्सची रक्कम, कर्मचारी यांचा हक्काचा पगार, ऊसतोड कामगारांचे कष्टाचे संपूर्ण पैसे मिळवुन देणार असल्याचे आणि त्या करिता पैसे मिळे पर्यंत कर्मचारी, शेतकऱ्यां सोबत लढा देणार असल्याचे शेतकरी नेते मोहन गुंड यांनी कारखाण्याच्या गेट समोर बेमुदत अंदोलन करणाऱ्या अंदोलकाना मार्गदर्शन करताना केले आहे. आता या अंदोलनात शेकापने उडी घेतल्याने हे अंदोलन अधिक तिव्र होणार आहे.

## खोटे लग्न करून दोन लाख उकळले

### बनावट वधुसह टोळी अटकेत

बीड । प्रतिनिधी

लग्नाच्या आमिषाने एक तरुणाला लाखोंना रुपयांना गंडा घालण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार वडवणीत उघडकीस आला आहे. विवाह जमविण्याच्या बहाण्याने वधू दाखवून ठरलेल्या पैशांनंतर लग्न लावण्यात आले. परंतु काही दिवसांतच वधूला आईसोबत परत नेण्याचा प्रयत्न केला असता, संपूर्ण प्रकरण फसवेगिरीचे असल्याचे उघड झाले. या प्रकारामागे तब्बल नऊ जणांची टोळी असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

ज्ञानेश्वर दत्तात्रय रोमन (वय २९, रा. पावरलूम वस्ती, वडवणी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची ओळख दाजी भागवत गायकवाड यांच्या माध्यमातून महादेव जनार्धन घाटे यांच्याशी झाली. घाटे याने ज्ञानेश्वरला लग्नासाठी मुलगी पाहण्याची व्यवस्था केली. १० ऑगस्ट २०२५ रोजी घाटे व त्याचे साथीदार राधा कैलास जाधव या नावाची एक मुलगी घेऊन ज्ञानेश्वरच्या घरी आले. यावेळी ओळख करून दिल्यानंतर लग्न ठरविण्यात आले. मात्र मुलीकडील मंडळींनी लग्नासाठी तब्बल २ लाख रुपयांची मागणी केली. शेवटी एक लाख सत्तर हजार रुपयांमध्ये सौदा ठरला.लग्न होण्याच्या आशेने ज्ञानेश्वरने एक लाख रुपये रोख जनार्धन थोरात याला दिले. पैशांचे व्हिडिओ रेकॉर्डिंगही करण्यात आले. तसेच उर्वरित रक्कम फोन पे द्वारे विविध खात्यांवर पाठवण्यात आली. यानंतर रात्री अकराच्या सुमारास राधा कैलास जाधव हिच्याशी ज्ञानेश्वरचे लग्न लावून देण्यात आले. १८ ऑगस्ट रोजी वधूच्या आईने फोन करून मुलीला परत बोलवण्यासाठी गाडी पाठविल्याचे सांगितले. त्यानंतर सोमेश वाघमारे आणि प्रियांका बाफना हे दोघे राधाला घेण्यासाठी आले. ज्ञानेश्वरला या होत असलेल्या सर्व हालचालींचा संशय आल्याने त्याने पोलिसांची मदत घेतली त्याच्या खबरी नंतर पोलिसांनी शिताफीने सर्वांना थेट वडवणी पोलिस ठाण्यात आणण्यात आले. चौकशीदरम्यान वधूचे खरे नाव राधा मुन्ना शर्मा असून तिचा पत्ता जालना येथील असल्याचे निष्पन्न झाले आणी लग्नाचे संपूर्ण प्रकरण फसवे असल्याचे स्पष्ट झाले.या प्रकरणी ज्ञानेश्वरच्या फिर्यादीवरून महादेव घाटे, कैलास दळवी, जनार्धन थोरात, वनमाला शर्मा, राधा शर्मा, माधुरी फिरोज खान, सोमेश वाघमारे, प्रियांका बाफना आणि एक अज्ञात महिला अशा नऊ जणांविरोधात संगनमत करून फसवणुकीचा गुन्हा वडवणी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. ही टोळी लग्नासाठी उतावीळ झालेल्या तरुणांचा शोध घेऊन त्यांना मुली दाखवते, लग्न लावून देते व नंतर बहाण्याने वधू परत नेत त्यांच्या विश्वासाला तडा देते, असे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे.

## लोळदगावमध्ये शाळेसाठी दातृत्वाचे अनेक हात पुढे

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लोळदगाव केंद्र कुर्ला जिल्हा बीड येथे बुधवारी मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेसाठी मुक्तहस्ते दान देणाऱ्या दानशूर व्यक्तींचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच अजय नाना घोडके होते .. यावेळी व्यासपीठावर उपसरपंच विकास घोडके , शहादेव घोडके शाळेचे मुख्याध्यापक बाळू घाडगे , शालेय व्यवस्थापन समितीचे श्रीराम घोडके , ज्ञानेश्वर घोडके ,बापू घोडके, राम प्रभू घोडके, गणपत घोडके, बिभीषण घोडके ,दीपक घोडके, महेश घोडके , अंकुश घोडके , शुभम घोडके , शंकर घोडके, तुकाराम घोडके, बंडू घोडके, आदी मान्यवर उपस्थित होते.




प्रारंभी शाळेचे पदवीधर विज्ञान शिक्षक भाऊसाहेब राणे सर यांनी शाळेची या कार्यक्रमापाठीमागची भूमिका स्पष्ट केली. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार लोक सहभागातून शाळेचा विकास यावर भर देण्यात आला आहे , शाळेला आवश्यक सर्व गरजा जर शाळा आणि गाव यांच्यामध्ये समन्वय असेल तर ते पूर्ण होऊ शकतात असे भाऊसाहेब राणे यांनी आपल्या प्रस्ताविकात म्हटले ... यावेळी शाळेतील सर्व मुलांनी देशभक्तीपर गाण्यावर कवायतीचे शानदार प्रदर्शन केले , उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्या वाजवून भरभरून दाद दिली , यावेळी वडिलांच्या स्मरणार्थ इतर खर्च टाळून शाळेसाठी ४३ इंच स्मार्ट टीव्ही शरद विश्वंभर घोडके आणि नवनाथ विश्वंभर घोडके या बंधूंनी शाळेसाठी सप्रेम भेट दिला त्याबद्दल त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

त्याचबरोबर शाळेसाठी रुपये ११००० देणगी देणारे गावातील प्रगतशील शेतकरी गोरख भाऊ घोडके यांचा सन्मान करण्यात आला... आपल्या अध्यक्षीय भाषणात सरपंच अजय नाना घोडके यांनी शाळेच्या रंगरंगोटी साठी ग्रामपंचायत निधी मधून आणि लोक सहभागातून दोन लाख रुपये देण्याची यावेळी घोषणा केली. या कार्यक्रमात यावर्षी नीट परीक्षेत यश संपादन करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथे प्रवेश घेणाऱ्या उन्नती घोडके , तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संजय तुकाराम घोडके आदींचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला बहुसंख्या ने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकुश डाके सर , तर आभार प्रिया मस्के मॅडम यांनी व्यक्त केले , कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक बाळू घाडगे , अंकुश डाके , भाऊसाहेब राणे, ट्रेनी शिक्षक सुशांत घोडके , शिल्पा जगदाळे , सुनिता जोशी , मंगल जाधव , आदींनी परिश्रम घेतले.

## अनुदान घोटाळा : २८ जणांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल; शेतकऱ्यांचीही होणार चौकशी

जालना । प्रतिनिधी

सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी, गारपीट आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने दिलेले अनुदान लाटून खाल्ले गेले. तब्बल कोटी रुपयाचा घोटाळा उघडकीस आला त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने तत्काळ गुन्हा दाखल करावा लागला याप्रकरणी जिल्हा प्रशासन हादरले असून परंतु राज्यामध्ये इतर जिल्ह्यात पण चौकशी होणे गरजेचे आहे., अखेर मंगळवारी (दि. १९) रात्री उशिरा अंबड पोलिस ठाण्यात २८ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानीपोटी शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा केले. मात्र, या प्रक्रियेत तहसीलदारांच्या ई-मेल आयडींचा गैरवापर, संगणकीय फेरफार आणि बनावट कागदपत्रांची निर्मिती करून शासनाची फसवणूक करण्यात आली. अशा संगनमताने २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा अपहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली होती. समितीने दिलेल्या अहवालानुसार तब्बल २१ तलाठ्यांना निलंबित करण्यात आले, तर इतरांविरुद्ध विभागीय चौकशीचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते. हा मुद्दा विधीमंडळाच्या अधिवेशनातही मोठ्या प्रमाणावर गाजला होता. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्यमंत्री यांनी आधीच गुन्हे दाखल करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार विद्यमान जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांना प्राधिकृत करून तक्रार नोंदविण्याच्या सूचना दिल्या. सहायक महसूल अधिकारी विलास कोमटवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला.फिर्यादीनुसार, आरोपींनी शासकीय निधी स्वतःच्या फायद्यासाठी बनावट दस्तऐवजाद्वारे हडप केला, संगणक प्रणालीत फेरफार केला, तसेच कागदोपत्री व संगणकीय अभिलेख नष्ट करून पुरावे मिटवण्याचा प्रयत्न केला. या घोटाळ्यातील आरोपींमध्ये महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी, संगणक ऑपरेटर व नेटवर्क इंजिनियर यांचा समावेश आहे. गणेश ऋषींदर मिसाळ या घोटाळ्यातील आरोपींमध्ये महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी, संगणक ऑपरेटर व नेटवर्क इंजिनियर यांचा समावेश आहे. गणेश ऋषींदर मिसाळ, कैलास शिवाजीराव घारेए बाळु लिंबाजी सानप,पवनसिंग हिरालाल सुलाने,शिवाजी श्रीधर ढालके,कल्याणसिंग अमरसिंग बमनावत,सुनिल रामकृष्ण सोरमारे, मोहित दत्तात्रय गोषिक, चंद्रकांत तुकाराम खिल्लारे,रामेश्वर नाना जाधव, डिगंबर गंगाराम कुरेवाड, किरण रविंद्रकुमार जाधव, रमेश लक्ष्मण कांबळे, सुकन्या श्रीकृष्णा गवते, विजय हनुमंत जोगदंड, निवास बाबुसिंग जाधव, विनोद जयराम ठाकरे, प्रविण भाऊसाहेब शिनगारे,बप्पासाहेब रखमाजी भुसारे, सुरज गोरख बिक्कड, सुशिल दिनकर जाधव (सहायक महसूल अधिकारी), (नेटवर्क इंजिनियर), विजय निवृत्ती भांडवले (तत्कालिन संगणक परिचालक), रामेश्वर गणेश बारहाते (महसूल सेवक), आशिष प्रमोदकुमार पैठणकर (सहायक महसूल अधिकारी), दिनेश बेराड (सहायक महसूल अधिकारी. या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक भगवान नरोडे यांनी ही कारवाई पोनि संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली केली असून, पुढील तपास सपोनि अमोल गुरले करत आहेत या या प्रकरण शेतकऱ्याची पण चौकशी होणार आहे यामध्ये कोणकोणत्या शेतकऱ्यांना खात्यावर पैसे गेले याची पण चौकशी होणार आहे

## पुढारी आणि जिल्हा प्रशासनाने पाहणी, पंचनाम्याची नाटकं बंद करावीत

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह राज्यभरात अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घेत लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकारी मदत दिली जाईल, असे आश्वासन दिले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील प्रशासनाला तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, या पंचनाम्यांचे काम केवळ फोटोसेशनपुरतेच मर्यादित राहत असून, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मदत मिळत नाही अशी नाराजी शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.



बीड तालुक्यातील जाधववाडी येथील शेतकरी नानीबाई भारत जाधव यांनी आपली व्यथा व्यक्त करताना सांगितले की, ''दरवर्षी पावसाळ्यात अडीच एकर शेती पाण्याखाली जाते. सोयाबीन, उडीद, मुग आदी पिकांचे मोठे नुकसान होते. पुढारी व अधिकारी येतात, फोटो काढतात, पंचनामे करतात, आश्वासन देतात; पण नंतर ढुंकूनही पाहत नाहीत. नानीबाई जाधव यांच्या मते, केवळ पंचनाम्यांची नाटकं करून शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळले जात आहे.

जाधववाडी शिवार राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने येथे अनेकदा पुढारी व अधिकारी दाखल होतात. मात्र शेतकऱ्यांची व्यथा फक्त कॅमेऱ्यासमोर ऐकून घेतली जाते. पंकजाताई मुंडे आणि आमदार संदीप क्षीरसागर यांनीदेखील या शिवाराला भेट देऊन फोटोसेशन केले, पण आजवर कोणतीही ठोस मदत झालेली नाही, असा आरोप लिंबागणेशकर सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळणारी ही ''पाहणी आणि पंचनाम्याची नाटकं'' तातडीने बंद करून प्रत्यक्ष मदत व कायमस्वरूपी उपाययोजना व्हाव्यात, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

# बीडमध्ये होणार दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

## उद्घाटनाला तीन मंत्र्यांची उपस्थिती, देश, विदेशातील संशोधक व तज्ज्ञांचा सहभाग

बीड । प्रतिनिधी

**भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त जनजाती गौरव विशेष कार्यक्रमांतर्गत बीडमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका या विषयावर आधारित हे चर्चासत्र २४ व २५ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार असल्याची माहिती संयोजन समितीचे मार्गदर्शक तथा नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर यांनी दिली. या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन नवगण शिक्षण संस्था संचलित पाटोदा येथील**



**वसंतदादा पाटील कला. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने केले असून भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थांचे सहकार्य लाभले आहे.**

उद्घाटन समारंभ २४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे उद्घाटन समारंभ होणार आहे. प्रमुख अतिथींमध्ये राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे मंत्री ना.डॉ अशोक उईके, अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री ना. नरहरी झिरवळ, आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक यांचा समावेश आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू, बीडचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच देश, विदेशातील संशोधक व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. समारोप दुसऱ्या दिवशी २५ ऑगस्ट रोजी होईल. तत्पूर्वी, चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी बीड शहरातील सौ. के एस. के. महाविद्यालयात २० ऑगस्टपर्यंत नोंदणी करावी. तसेच, संपूर्ण शोधनिबंध सादरीकरणाची अंतिम तारीख २१ ऑगस्ट असणार आहे.

### सहभाग व कार्यक्रमाची वैशिष्ट्ये

या चर्चासत्रात भारतासह विदेशातील नामांकित इतिहासकार, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक विचारवंत व संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. एकूण १३ शैक्षणिक सत्रांमध्ये तज्ज्ञांचे व्याख्यान, संशोधनपत्रांचे सादरीकरण व चर्चा होईल. तसेच, बहुविद्याशाखीय चर्चासत्र, आदिवासी नायकांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्यावर विशेष भर, सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत आदिवासी कला, संगीत व परंपरेचे सादरीकरण, निवडक संशोधनपत्रांचे प्रकाशन होईल.

### अशी आहे संयोजन समिती

संयोजन समितीचे मार्गदर्शक नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर हे आहेत. तसेच, आयोजक सचिव प्राचार्य आबासाहेब हंगे, सहसचिव डॉ.सिद्धार्थ जाधव. कोषाध्यक्ष डॉ. विश्वंभर देशमाने, सल्लागार डॉ. सुधाकर गुट्टे, परिषद संयोजक प्रा.हमराज उईके यांचा संयोजन समितीमध्ये समावेश आहे.

### परिषदेची उद्दिष्टे

**जगभरात ३७ चर्चासत्र होत आहेत. त्यापैकी ५ आंतरराष्ट्रीय तर उर्वरित राष्ट्रीय पातळीवरील असतील. ५ आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांपैकी बीडमध्ये १ होत आहे. यानिमित्ताने बीडचे नाव जगभरातील शैक्षणिक, सामाजिक वर्तुळात जात आहे. या परिषदेचा मुख्य हेतू म्हणजे भारताच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय विकासामध्ये जनजाती समाजाचे योगदान अधोरेखित करणे, त्यांच्या समृद्ध परंपरेचा व शौर्याचा गौरव करणे व त्यांच्या वारशाचे पुनर्मूल्यांकन करणे होय. वसाहतवादी राजवटीविरुद्धच्या संघर्षांपासून ते अद्वितीय सांस्कृतिक वारशापर्यंत आदिवासी समाजाने भारतीय ओळख घडविण्यात दिलेले योगदान चर्चेत येणार आहे.**

# बीडमधील मोटार सायकल चोरणारी टोळी पकडली

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; सात मोटारसायकली हस्तगत



बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये मोटार सायकल चोरणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले होते. दिनांक २०.०८.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारामार्फत माहीती मिळाली की, बीड मध्ये विवीध ठिकाणाहुन चोरी गेलेल्या मोटार सायकली हया निलेश विष्णु गायकवाड याने चोरल्या असुन तो सध्या त्याचे राहते घरासमोर उभा आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन ताबडतोब पथकाने सदरील ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेवुन चोरी केलेल्या मोटार सायकली कोठे आहेत या बाबत विचारपुस केली असता त्याने सदरील मोटार सायकली त्याचा साथीदार शिवाजी यलप्पा जाधव याचे कडे विक्री साठी ठेवल्या आहेत असे सांगीतले.

त्यावरुन शिवाजी जाधव याचे कडुन एकुण ०७ मोटार सायकल मिळुन आल्या. त्याचे कडुन मिळुन आलेल्या मोटारसायकल वरुन खालीलप्रमाणे मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं १०९/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस, पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं २५६/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस ,पोलीस ठाणे बीड शहर गु.र. नं ३०३/२०२४ कलम ३०३,बी.एन.एस ४. पोलीस ◀◀ पान ३ वर

# पाटोदा आरोग्य कर्मचाऱ्यांचे बेमुदत आंदोलन



पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचारी यांचे दि. १४/०३/२०२४ चे शासन निर्णयानुसार नियमित शासन सेवेत समायोजनाची मागणी अद्याप पुर्ण न झाल्याने दि.१९ ऑगस्ट २०२५ पासुन बेमुदत कामबंद आंदोलन पाटोदा येथे सुरू आहे.

मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५ पासून राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांचा "बेमुदत संप पुकारला असून यामध्ये पाटोदा आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी या बेमुदत संपात सहभागी झाले आहेत. यामध्ये असणाऱ्या मागण्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचे समकक्ष पद व समान शैक्षणिक पद समायोजनात नसेल तर या कर्मचारी यांच्या सेवा समायोजनासाठी वित्त विभागाचा शासन निर्णय दि. १५ जुलै २०२५ नुसार आकृतीबंध मध्ये नवीन पद निर्माण करावे.सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत उपकेंद्राच्या प्रस्तावीत आकृतीबंदामध्ये कंत्राटी समुदाय आरोग्य अधिकारी असे प्रस्तावीत केले आहे त्याऐवजी नियमित समुदाय आरोग्य अधिकारी पद निर्माण करावे.

कंत्राटी आयुष वैद्यकिय अधिकारी (), वैद्यकिय अधिकारी यांचे गट-व वैद्यकिय अधिकारी म्हणून आयुर्वेदिक डिस्पेंसरी, प्रा. आ. केंद्र, ग्रा.रु.व उपजिल्हा रुग्णालय, रुग्णालय, वैद्यकिय शिक्षण विभाग, महानगरपालिका, जिल्हा कारागृह विभागात समान शैक्षणिक अर्हतेनुसार आणि , यांना वैद्यकिय अधिकारी गट-व यांना , व येथे समायोजन करावे या सह आदी मागण्यासाठी पाटोदा आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे बेमुदत आंदोलन चालू आहे

# परळीत पशुवैद्यक मेळावा संपन्न




परळी । प्रतिनिधी

**परळी वैजनाथ येथे श्रद्धा मंगल कार्यालयामध्ये दिनांक २० ऑगस्ट रोजी बुधवारी पशुवैद्यक मेळावा संपन्न झाला या ठिकाणी पशु संबंधित अनेक ठराव घेण्यात आले.**

परळी झालेल्या मेळाव्यामध्ये बीड जिल्ह्यात दूध भुकटी प्रकल्प उभारावा, तूप प्रकल्प तसेच दूध डेरी तंत्रज्ञान महाविद्यालय व्हावे, अखिल भारतीय पातळीवर पशुप्रदर्शन परळी येथे व्हावे , याबरोबरच पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये एक जागा निर्माण करावी प्रत्येक जिल्ह्यात व पशुविज्ञान केंद्र सुरू करावे अशा मागणीचे ठराव मंजूर करण्यात आले. अशी माहिती महाराष्ट्र शेळी उत्पादक संघाचे अध्यक्ष डॉ. वसंत मुंडे यांनी दिली.

## अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करा -श्रीहरी मोरे



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यात गेल्या ५ ते ६ दिवसापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकरी बांधवांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

गेल्या ५ ते ६ दिवसापासून माजलगाव तालुक्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन,तूर,कापूस, बाजरी, हे पिके पूर्णतः ◀◀ पान ३ वर

# पाटोद्यात एस.टी चे वेळापत्रक कोलमडले साकत मार्ग मुंबई ७-१५ ची बस ८-२९ ला

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा आगारातून सुटणारी साकत मार्गे मुंबई दि.१९ रोजी सकाळी ७-१५ ची बस ८-२९ ला गेली असून तर कंधार आगाराची बस कंधार पुणे आळंदी ही बस ३-३० कंधार येथुन पाटोद्यात येते या बसचे चालक .वाहक बदलतात मात्र पाटोदा आगाराच्या सावळा गोंधळामुळे हि बस ६.३० ला गेली पुण्याकडे दोन तास प्रवाशांचे अतोनात हाल झाले असून बहुतांश बसचे वेळापत्रक कोलमडले आहे तरी याकडे विभाग नियंत्रक बीड.यांनी वेळेवर बस जाण्यासाठी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.तर पाटोदा आगाराचे आगार प्रमुख तिडके यांनी साकत मार्ग मुंबई उशिरा गेल्यामुळे संबंधितास तंबी दिली आहे.



# ज्येष्ठ पत्रकार प्रा. एस.ए.सत्तार यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव महाविद्यालय माजलगाव चे (सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे) सेवानिवृत्त प्राध्यापक एस ए सत्तार यांचे दि २० ऑगस्ट बुधवार रोजी दुःखद निधन झाले आहे.



प्राध्यापक सत्तार यांनी एकेकाळी माजलगावची पत्रकारिता खूप गाजवली होती. अनेक विकास कामाच्या बातम्या, तसेच भ्रष्टाचाराची प्रकरणे त्यांनी आपल्या लेखणीतून समाजासमोर आणली होती. शासना समोर मांडली होती.त्यांनी दैनिक लोकमतचे माजलगाव प्रतिनिधी म्हणून काम केले होते , त्याचप्रमाणे त्यांनी स्वतःचे एक वृत्तपत्र माजलगाव पत्रिका हे देखील सुरू केले होते. १९८० ते ९० च्या दशकामध्ये माजलगाव पत्रिका हे वृत्तपत्र त्यावेळी माजलगावकरांची वाचनाची चांगली भूक भागवत होते या वृत्तपत्राच्या माध्यमातून देखील त्यांनी अनेक विकास ◀◀ पान ३ वर

# डॉ.प्रज्वल उखळीकरची १०९५ रॅन्क मिळवत यशाला गवसणी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

वैद्यकीय उच्च शिक्षणात अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा मानल्या जाणाऱ्या वैद्यकीय राष्ट्रीय परीक्षेत (नीट- पीजी) चि.डॉ. प्रज्वल दिनकरराव उखळीकर (जोशी) याने देशातील पहिल्या अकराशे यशस्वितांमध्ये स्थान मिळवले आहे. नीट- पीजी २०२५ परीक्षेत त्याने राष्ट्रीय स्तरावर उत्तुंग यश संपादन केले असुन लाखोंच्या स्पर्धेत १०९५ वा रॅन्क मिळवत यशाला गवसणी घातली आहे.या उत्तुंग यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस () कडून वैद्यकीय राष्ट्रीय परीक्षा घेण्यात आली होती. देशभरातील वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणार्या लाखो विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची असणार्या नीट-पीजी २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेसाठी २.४२ लाख उमेदवारांनी नोंदणी केली होती.ही परीक्षा ◀◀ पान ३ वर

# डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त परळीत निर्भय बनो मॉर्निंग वॉक संपन्न

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळी च्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त परळी शहरातील जिजामाता उद्यान ( गार्डन ) येथे दिनांक २० ऑगस्ट रोजी निर्भय बनो मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले होते.

या मॉर्निंग वॉकला परळी येथील जिजामाता उद्यान ( गार्डन ) दिनांक २० ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी ठीक ७ वाजता सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीच्या सर्व पदाधिकारी व पुरोगामी विचारांच्या नागरिकांनी पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली. त्या नंतर निर्भय बनो मॉर्निंग वॉक करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी ही केली. याप्रसंगी जेष्ठ अंनिस सदस्य जी.एस.सौंदळे,प्रा. विलास



रोडे,रानबा गायकवाड,अनिलराव मस्के , अशोक मुंडे,विकास वाघमारे,दिपक शिरसाट, नवनाथ दाने, पत्रकार संभाजी मुंडे, पत्रकार संजीब रॉय, विठ्ठलराव झिलमेवाड,बाळासाहेब किरवले,राहुल सुर्यवंशी,माधव अजले,भगवान राठोड,विनायक काळे,भानुदास उपाडे,आनंद तुपसमुद्रे,सुमित कलशेटे आदी उपस्थित होते.

# गुत्तेदार आणि प्रशासनाने कड्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे केले वाटोळे

## २८ महिन्यापासून सतरा किलोमीटरचे काम सुरूच,अजूनही राष्ट्रीय महामार्ग अपूर्णच

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी साबलखेड या राष्ट्रीय महामार्गाचे काम १ एप्रिल २०२३ पासून सुरू झाले असून या कामाची सतरा महिन्याची कालमर्यादा होती. आता २८ महिने झाले तरी सतरा किलोमीटरचे काम अजूनही सुरू आहे.या रस्त्यावरील कडा, शेरी बुद्रुक, खकाळवाडी, जळगाव,जोशी वस्ती, कासारी, येथील पुलाचे काम कासव गतीने सुरू असून, याठिकाणी पर्यायी वाहतुक करण्यासाठी मुरूम व नळकांड्या टाकुन पर्यायी रास्ता बनविण्यात आला असून आता



यावर चिखलाचे साम्राज्य झाल्याने दरररोज किमान पाच अपघात होत आहेत.

अहिल्यानगर बीड या राष्ट्रीय महामार्गावर साबलखेड ते आष्टी या १७ किलोमीटर अंतराचे सिमेंटरस्त्याचे काम सुरू होऊन २८ महिन्याचा कालावधी झाला तरीही अद्याप पर्यंत या रस्त्याचे काम पूर्ण झालेले नाही.व अनेक ठिकाणी अर्धवट अवस्थेत रस्ता पडला आहे.त्यामुळे वाहनधारकांना कोणत्या साईटने वाहन चालवावे असा प्रश्न पडत आहे.त्यातच दररोज या राष्ट्रीय महामार्गावर किमान चार ते पाच तरीअपघात होऊन अनेक जण जखमी झाले आहेत.याशिवाय या रस्त्यावरील एकही पुलाचे काम पूर्ण झाले नाही.एक वर्षापासुन कासव गतीने सुरू ◀◀ पान ३ वर

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला जामीन मंजुर

माजलगाव । प्रतिनिधी

कृष्णा माणिक थावरे रा. आनंदगाव ता. माजलगाव जि.बीड यांच्यावर महादेव गायकवाड याचा खुन केल्याच्या प्रकरणी मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्रीमती राजेश्री परदेशी मॅडम माजलगाव यांच्या न्यायालयाने जामीन मंजुर केला.



फिर्यादी आशितोष महादेव गायकवाड राहणार माजलगाव यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती की, दि. २० / ४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता रोहित शिवाजीराव थावरे हा चार ते पाच अज्ञात व्यक्तींसह मासे घेऊन त्यांच्या ढाब्यावर जेवणासाठी गेला होता, . मासे तयार केल्यानंतर, सर्वांनी जेवण केले जेवण केल्यानंतर, त्यांनी एकमेकांशी भांडणे सुरू केली आणि ढाब्यातील वस्तूंचेही नुकसान केले , तक्रारदाराने भांडण शांत करण्याचा प्रयत्न केला तेव्हा आरोपी रोहित थावरे यांनी त्यांना शिवीगाळ केली आणि ढाब्याच्या स्वयंपाकघरातून जळण्याची काठी उचलली आणि तक्रारदाराच्या पाठीवर, कानाजवळ आणि उजव्या डोळ्यावर मारहाण करण्यास सुरुवात केली आणि त्यामुळे तक्रारदाराला दुखापत झाली. तक्रारदाराचे वडील भांडणात मध्यस्थी करण्यासाठी गेले तेव्हा आरोपींनी तक्रारदार आणि त्याच्या वडिलांना पकडून मारहाण केली आणि त्यामुळे त्यांच्या वडिलांना गंभीर दुखापत झाली आणि जीवे मारण्याची धमकी दिली, ही घटना पाहून इतर कर्मचारी घटनास्थळावरून पळून गेली . या घटनेत एका कर्मचाऱ्यालाही दुखापत झाली. या आणि इतर आरोपांवरून रोहित आणि दोन ते तीन अज्ञात व्यक्तींविरुद्ध आशितोष महादेव गायकवाड यांच्या फिर्यादीवरून ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरुवार, दि. २१ ऑगस्ट २०२५ । पान ७

# पुणे-लोणावळा लोकल सेवेबाबत मोठा निर्णय!

## अखेर दोन नव्या मार्गीकेला राज्य सरकारची मंजुरी

पुणे । प्रतिनिधी

**मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये पुणे लोणावळा लोकलबाबत केंद्र आणि राज्य सरकारकडून एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पुणे लोणावळा दरम्यानच्या लोकल सेवेच्या दोन नवीन मार्गीकेला मंजुरी देण्यात आली आहे.**



यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून या संदर्भात नागरिकांनाकडून करण्यात आलेल्या मागणीला यश मिळालं आहे. या महत्वपूर्ण निर्णयामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी यांसदर्भात केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरवठा केला जात होताो.

अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळालं आहे. पुणे-लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वे गाड्यांची कनेक्टिव्हिटी वाढावी आणि या दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा द्यावा, यासाठी तिसऱ्या आणि चौथ्या मार्गीका सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला जात होता. केंद्र सरकारने या प्रकल्पाला सकारत्मकता दर्शविल्यानंतर आता राज्य सरकारनेही याला मुंजुरी दिल्याने पुणेकरांसाठी हे मोठं गिफ्ट असणार आहे. या प्रकल्पाचा खर्च केंद्र आणि राज्य सरकार समान करणार असून यासंदर्भात मोहोळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी प्रत्यक्ष भेटून मागणी केली होती. यामुळे आता दोन्ही मार्गीकाचा मार्ग मोकळा झाला आहे.

खरंतर पुणे लोणावळा दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. तिसरी आणि चौथी मार्गीका सुरू झाल्यास रेल्वेचं जाळ आणखी विस्तारलं जाणार असून, हे जाळं मजबूत होण्यास मदत होईल. रेल्वे गाड्यांची संख्याही वाढेल. तसेच एक्सप्रेस गाड्यांचा वेगही वाढेल. याचा फायदा औद्योगिक, व्यावसायिक, नोकरदार आणि विद्यार्थी वर्गाला मोठ्या प्रमाणात होणार आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीतील भ्रष्टाचाराच्या चौकशीत दिरंगाई

पुणे । प्रतिनिधी

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील भ्रष्टाचाराबाबतच्या चौकशीत दिरंगाई होत आहे.




बाजार समितीशी संबंधित नसलेल्या सहनिबंधक दर्जाच्या त्रयस्त अधिकाऱ्यांबाबत चौकशी करावी, अशी मागणी शेतकरी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ता विकास लवांडे यांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणनमंत्री जयकुमार रावल आणि प्रधान सचिव प्रवीण दराडे यांच्याकडे देण्यात आले आहे. पणनमंत्र्यांनी पावसाळी अधिवेशनात कृषी उत्पन्न बाजार समितीची उच्चस्तरीय चौकशीची घोषणा केली होती. प्रत्यक्षात मात्र समिती स्थापन झालीच नाही. दरम्यान, पणन संचालकांनी ७ जुलै २०२५ रोजी चौकशीचे आदेश दिले होते. यामध्ये जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. मात्र, ते बाजार समितीच्या गैरव्यवहार व गैरकारभारास पाठबळ देत असल्याचा आरोप विकास लवांडे यांनी केला आहे. त्यामुळे त्रयस्त वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करावी, अशी मागणीही लवांडे यांनी केली

डॉ. धोंडकर यांची चौकशी करा

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भ्रष्टाचाराबाबत दोन वर्षांपासून अनेक तक्रारी येत आहेत. त्यामध्ये अनेक बेकायदेशीर कामे झाली आहेत आणि करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. ही सर्व कामे संस्थेचे सचिव म्हणून काम

पाहणारे डॉ. राजाराम धोंडकर अडवू शकत होते. मात्र, त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे त्यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांनी केली आहे.

# सर्व्हर डाऊनमुळे दस्तनोंदणीला ब्रेक; देखभाल दुरुस्तीनंतरही कारभार संथगतीनेच

पुणे । प्रतिनिधी

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या दस्तनोंदणी प्रणालीचा सर्व्हर डाऊन झाल्याने सोमवारी (दि.१८) आणि मंगळवारी (दि.१९) या दोन दिवशी दस्तनोंदणीचे काम संथगतीने सुरू होते, अशी माहिती कन्व्हेन्सिंग प्रॅक्टिशनर असोसिएशनने दिली.




नोंदणी व मुद्रांक विभागाने दि. १५, १६ व १७ ऑगस्ट २०२५ रोजी नोंदणी विभागाचा सर्व्हर आवश्यक देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी बंद ठेवला होता. या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील दस्त नोंदणीची प्रक्रिया, तसेच नोंदणी विभागाच्या सर्व ऑनलाइन सेवा बंद राहिल्या. या देखभालीनंतर दि. १८ ऑगस्टपासून सर्व सेवा नियमित सुरू होतील, अशी अपेक्षा नागरिक, वकील, दस्त लेखनकार व नोंदणी कार्यालयांना होती.मात्र, प्रत्यक्षात सोमवारपासून सर्व्हर अत्यंत संथगतीने सुरू झाल्याचे निदर्शनास आले. यामुळे दस्तनोंदणी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात विलंब झाला. याशिवाय दस्त हाताळणी शुल्क भरणे, डाटा एन्ट्री करणे, ऑनलाइन पडताळणी व इतर पूरक सेवा जवळजवळ ठप्प झाल्या होत्या. मंगळवारीही परिस्थितीत विशेष सुधारणा झाली नाही. सर्व्हर अजूनही अत्यंत संथगतीने कार्यरत असून, ऑनलाइन सेवा सुरळीत झालेल्या नाहीत.

परिणामी नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली, अशी माहिती कन्व्हेन्सिंग प्रॅक्टिशनर अससोसिएशनने दिली आहे. नोंदणी विभागाने त्वरित व परिणामकारक तांत्रिक उपाययोजना करून सर्व्हर व ऑनलाइन सेवा सुरळीत कराव्यात, अशी मागणी असोसिएशनने केली आहे.

# खडकवासला धरणातून सर्वाधिक विसर्ग


पुणे । प्रतिनिधी

शहर व ग्रामीण भागातील शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मागील २४ तासांपासून जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे या चारही धरणांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. पर्यायाने पानशेत, वरसगाव आणि टेमघर या तीन धरणांतून विसर्ग वाढविण्यात आला.



या तीन धरणांतून सोडलेले पाणी खडकवासला धरणात जमा होते. त्यामुळे खडकवासला धरणातून दिवसभरात विसर्गामध्ये टप्प्याटप्याने वाढ करण्यात आली. रात्री सात वाजता खडकवासला धरणातून तब्बल ३५ हजार ५१० क्युसेकने पाणी नदीत सोडण्यात आले. खडकवासला धरणातून सोडण्यात आलेला हा विसर्ग यंदाच्या हंगामातील सर्वाधिक असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या या चारही धरणांच्या परिसरात सोमवारी (दि. १८) सकाळपासूनच पाऊस सुरू आहे. मंगळवारीही दिवसभर पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाला. मागील २४ तासांत खडकवासला धरणात ७१ मिमी, पानशेत धरणात १८१ मिमी, वरसगावमध्ये १६५ मिमी आणि टेमघर धरणात १८६ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली.मंगळवारी दिवसभरात टेमघर धरणात १०५ मिमी, वरसगाव धरणात ८९ मिमी, खडकवासला धरणात ५३ मिमी आणि पानशेत धरणात ९५ मिमी पाऊस पडला. त्यामुळे सर्वच धरणात येणारा पाण्याचा येव्यात मोठी वाढ झाली. पर्यायाने धरणांच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली. त्यामुळे या चारही धरणातून सोडण्यात येणाऱ्या विसर्गात वाढ करण्यात आली. खडकवासला धरणातून सकाळी सहा वाजता १ हजार क्युसेकने सुरू असलेला विसर्ग रात्री सात वाजता ३५ हजार ५१० एवढा करण्यात आला.

# अकरावीच्या प्रवेशासाठी २२ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ



पुणे । प्रतिनिधी

राज्यात काही जिल्ह्यांत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे अकरावी प्रवेशासाठी मुदतवाढ दिली असून सर्वांसाठी खुला फेरीतून विद्यार्थ्यांना २२ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेता येईल.

राज्यातील ९ हजार ५२५ कनिष्ठ महाविद्यालयातील २१ लाख ५० हजार १३० जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यात आतापर्यंत १२ लाख ३ हजार ४१६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. आतापर्यंतच्या फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी, पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी, एटीकेटी विद्यार्थ्यांसाठी सर्वांसाठी खुला या फेरीअंतर्गत विशेष फेरी राबवण्यात येत आहे. त्यासाठी १७ ऑगस्ट मुदत होती.राज्यात काही जिल्ह्यांमध्ये होत असलेल्या मुसळधार पावसामुळे उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना सुटी देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी २० ऑगस्टपर्यंत दिलेली मुदत २२ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे.

# दंत तपासणी शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे । प्रतिनिधी

भारती विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू तंत्रनिकेतन, धनकवडी आणि भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाच्या दंत महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २० ऑगस्ट) दंत तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराला विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दंत आरोग्याविषयी जागरूकता दाखवली.




शिबिराचे आयोजन दंत महाविद्यालयाचे डॉ. अमर शा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये दंत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच मोफत दंत तपासणी आणि मार्गदर्शन करणे, हे या शिबिराचे प्रमुख उद्दिष्ट होते. तज्ञ दंतचिकित्सकांनी सहभागींची तपासणी करून दातांची स्वच्छता, रोगप्रतिबंधक उपाय आणि दंत आरोग्याचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. आवश्यकतेनुसार उपचारांच्या सूचनाही देण्यात आल्या.

या शिबिराला सुमारे ४०० विद्यार्थी आणि शिक्षकांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजना (छडड) स्वयंसेवकांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहकार्य केले. प्राचार्य ऋषिकेश देशमुख आणि उपप्राचार्य अमित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराची यशस्वी सांगता झाली. शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये दंत आरोग्याविषयी सजगता निर्माण झाली असून, उपयुक्त माहिती मिळाल्याबद्दल सहभागींनी समाधान व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्य जागरूकता वाढण्यास मदत होत असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले.

# कवठे येमाई येथे उसाच्या शेतात सापडला मृतदेह; खुनाचा संशय

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील गांजेवाडी, गणेशनगर परिसरात बुधवारी (दि. २०) सकाळी एक धक्कादायक घटना समोर आली. फाकटे (ता. शिरूर) येथील देवराम नानाभाऊ टेके (वय अंदाजे ५०) यांचा मृतदेह उसाच्या शेतात आढळून आला असून, त्यांच्या मृत्यूमागे खुनाचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा तपास शिरूर पोलिसांनी तातडीने हाती घेतला असून, खून झाला असल्यास त्यामागील कारणांचा शोध घेतला जात आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, टेके मंगळवारी (दि. १९) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घराबाहेर पडले होते. नातेवाइकांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी साडेनऊ ते पावणेदहा वाजेपर्यंत त्यांचा मोबाइल सुरू होता; परंतु त्यानंतर तो बंद झाला. संपूर्ण दिवसभर ते घरी परतले नाहीत किंवा त्यांच्याशी संपर्कही होऊ शकला नाही. यामुळे चिंतेत असलेल्या मुलांनी आणि नातेवाइकांनी त्यांचा शोध सुरू केला. दरम्यान, फाकटे येथील एका तरुणाने मंगळवारी टेके यांना गणेशनगर-गांजेवाडी रस्त्याने जाताना पाहिल्याचे सांगितले. बुधवारी सकाळी नातेवाइकांनी या मार्गावर शोध घेतला असता, कवठे येमाई येथील गांजेवाडी रोडवरील एका पोल्ट्री शेजारी टेके यांची दुचाकी आढळली. तिथून अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या उसाच्या शेतात त्यांचा मृतदेह सापडला. मृतदेहाच्या डोक्यावर आणि मानेजवळ गंभीर जखमा आढळून आल्या असून, प्राथमिक तपासात खुनाचा संशय बळावला आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शिरूर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच शिरूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक कारंडे, पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तपासाला गती देण्यात आली असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मयताच्या मृत्यूमागील कारणांबाबत परिसरात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.



# ‘हर हर महादेव’चा जयघोष...! शिरूरमध्ये श्री क्षेत्र टाकळी हाजी ते श्री क्षेत्र रामलिंग कावड यात्रा उत्साहात संपन्न

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्याच्या बेट भागातील श्रद्धाळूंसाठी सोमवारी (दि.१८) धर्म जागरण समिती व शिवबा संघटनेच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील पहिलीच श्री क्षेत्र टाकळी हाजी ते श्री क्षेत्र रामलिंग अशी कावड यात्रा उत्साहात पार पडली.सकाळी सात वाजता टाकळी हाजी येथील घोडनदी तीरावर गंगा पूजन करून यात्रेची सुरुवात झाली. कावडीधारी तरुणांच्या ‘हर हर महादेव’ घोषणांनी वातावरण दुमदुमले. डोंगरगण, आमदाबाद, अण्णापूर आदी गावांतील ग्रामस्थांनी कावड यात्रेचे पूजन, फुलांची उधळण व फटाक्यांच्या आतषबाजीने भव्य स्वागत केले. दुपारी दोन वाजता यात्रेचा समारोप श्री क्षेत्र रामलिंग येथे झाला.

रामलिंग देवस्थान विश्वस्त मंडळाने यात्रेतील भाविकांसाठी विशेष अभिषेक व दर्शनाची सोय केली होती. यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शिरूर पोलिसांनी योग्य ती खबरदारी घेतली होती.या यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी टाकळी हाजीसह परिसरातील उद्योजक, ग्रामस्थांनी मोठे सहकार्य केले. यात्रेचे नियोजन धर्म जागरण समितीचे माऊली घोडे व शिवबा संघटनेचे सोमनाथ भाकरे यांनी केले. रामलिंग गावचे विश्वस्त नामदेव घावटे व धर्म जागरण समितीचे सचिन तागड यांनी यात्रेत सहभागी सर्व तरुण भक्तांचे आभार मानले.

# प्रत्येक घरातून नवे डॉ. कलाम घडले पाहिजे : आमदार थोरवे

कर्जत । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थी देशाचे भविष्य आहेत. मोबाईलपेक्षा संगणकाचा वापर करा आणि डिजिटल शिक्षणाचा लाभ घेत प्रत्येक घरातून नवा डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम घडवा, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.

रायगड जिल्हा परिषद आदर्श केंद्र शाळा, कळंब (कर्जत) येथे मंगळवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता आमदार थोरवे यांच्या हस्ते अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा (ई-लर्निंग क्लासरूम) चे उद्घाटन पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रयोगशाळा व क्रीडांगणासाठी मोठा निधी मंजूर करण्याची घोषणा आमदारांनी केली.कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे, केंद्रप्रमुख माधुरी पाटील, मुख्याध्यापक एच. के. लोहकरे, जिल्हा परिषद कमिटी अध्यक्ष रविंद्र बदे, विधानसभा संघटक शिवराम बदे, माजी सभापती राहुल विशे, सरपंच प्रमोद कोंडिलकर यांच्यासह मान्यवर, ग्रामस्थ व शिंदे गट शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थिनींनी लेझीमच्या तालावर आमदारांचे स्वागत केले. तर विद्यार्थ्यांनी आपल्या कलेतून ‘पहलगाम हादसा’ आणि ‘मिशन सिंदूर’चे सादरीकरण केले. तसेच गावातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तरुणांचा आमदार थोरवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# मोई येथील सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी जीवन येळवंडे, उपाध्यक्षपदी मनिषा गवारी यांची बिनविरोध निवड

खेड । प्रतिनिधी

मोई (ता. खेड) येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी जीवन येळवंडे आणि उपाध्यक्षपदी मनिषा गवारी यांची बिनविरोध निवड झाली आहे. संस्थेचे सचिव निलेश देशमुख यांनी ही माहिती दिली.



संस्थेच्या इतर संचालकांना काम करण्याची संधी मिळावी यासाठी मावळते अध्यक्ष ज्ञानेश्वर गवारी आणि उपाध्यक्षा सुरेखा करपे यांनी ठरल्याप्रमाणे आपल्या पदांचा राजीनामा दिला. त्यामुळे रिक्त झालेल्या या पदांसाठी चाकण येथील संस्थेच्या कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी एम. पी. राऊत यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. अध्यक्षपदासाठी जीवन येळवंडे आणि उपाध्यक्षपदासाठी मनिषा गवारी यांनी सर्वानुमते अर्ज दाखल केले. कोणताही विरोधी अर्ज न आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा एम. पी. राऊत यांनी केली.

या प्रसंगी संस्थेचे संचालक भगवान साकोरे, समीर गवारी, संभाजी करपे, ज्ञानेश्वर गवारी, सुरेखा करपे, जालिंदर गवारी, रवींद्र गवारी, कानिफनाथ गवारी, गोरख फलके, चेतन गवारी यांच्यासह आजी-माजी सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचा सर्व संचालकांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

cmyk